- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर   संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : सोमवार, २८ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २८९ | किंमत : २ रूपये

सोने-चांदी
- २४ कॅरेट : १,५२,७०० /-
- २३ कॅरेट : १,५०,३५० /-
- चांदी : २,४८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# देशभरातील बँक कर्मचाऱ्यांचा संप मागे

## रात्री उशीरा कर्मचारी संघटनांची बैठक

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
बँकांचे व्यवहार करणाऱ्यांसाठी महत्वाची बातमी समोर आली आहे. देशभरातील बँकांचे कर्मचारी उद्या, २८ सप्टेंबरपासून संपावर जाणार होते. मात्र, हा तीन दिवसांचा संप स्थगित करण्यात आला आहे. संपाच्या केवळ एक दिवस आधी, आयबीए आणि बँक कामगार संघटनांची संघटना, यूएफबीयू, यांनी रात्री उशिरा एक बैठक घेतली. या बैठकीत अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली आणि काही निर्णय घेण्यात आले आहेत. संप स्थगित करण्यात आला आहे.
दरम्यान, उद्यापासून म्हणजे २८ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२६ या तीन दिवसांसाठी देशव्यापी बँक संपाचे आयोजन करण्यात आले होते. युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सने या संपाची घोषणा केली होती. मात्र, आज रात्री उशीरा बँक कर्मचारी संघटनांची बैठक झाली. या बैठकीत उद्यापासून होणारा तीन दिवसांचा संप स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, नेमका तोडगा निघाला की नाही? याबाबतची माहिती अद्याप मिळालेली नाही.

**सलग पाच दिवस बँका बंद राहू नये, ग्राहकांना संपाचा फटका बसू नये म्हणून रविवारी बँका सुरु**
सलग पाच दिवस बँका बंद राहू नये, ग्राहकांना संपाचा फटका बसू नये यासाठी रविवारी देखील बँका सुरु ठेवण्यात आल्या होत्या. सप्टेंबरमधील




चौथ्या शनिवार मुळं बँका काल बंद होत्या. ग्राहकांची गैरसोय होऊ नये यासाठी रविवारी बँकांचं कामकाज सुरु ठेवण्यात आलं होतं. आता उद्यापासून सलग तीन दिवस बँका बंद राहणार असल्यानं चेक क्लिअरन्स, बँक खात्यातून रोख रक्कम काढणे आणि जमा करणे यासह इतर बँकिंग सेवा प्रभावित होऊ शकतात. बँक कर्मचारी यूनियनच्या संपाचा परिणाम सार्वजनिक बँका, जुन्या खासगी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांमध्ये पाहायला मिळू शकतो.

**प्रमुख मागणी म्हणजे पाच दिवसांचा कामाचा आठवडा**
संपावर जाणाऱ्या बँक कर्मचाऱ्यांची प्रमुख मागणी म्हणजे पाच दिवसांचा कामाचा आठवडा ही आहे. यूनियनच्या नेत्यांच्या माहितीनुसार मुख्य श्रम आयुक्तांसोबत झालेल्या चर्चेत सरकारकडून पाच दिवसांचा कामाचा आठवडा लागू करण्यावर ठोस आश्वासन दिलं नाही. एआयबीओसीचे महासचिव रुपम रॉय यांनी सरकार आणि व्यवस्थापनाच्या आडमुठ्या धोरणामुळं यूनियनला आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यास भाग पडलं, असं म्हटलं.
काही सरकारी आणि वित्तीय संस्थांमध्ये पाच दिवसांच्या कामाच्या आठवड्याची पद्धत लागू आहे. एनसीबीईचे महासचिव एल चंद्रशेखर यांनी देखील केंद्र आणि राज्य सरकारची कार्यालये, आरबीआय, एलआयसी, जीआयसी, नाबार्ड या सारख्या इतर संस्थांमध्ये पाच दिवसांचा आठवडा सुरु आहे. शेअर बाजार, चलन बाजार आणि विदेशी चलन बाजारात देखील आठवड्यात पाच दिवस काम चालतं, असं म्हटलं.
पेन्शनच्या लाभातील सुधारणा, सर्व पेन्शनधारकांना एक समान महागाई भत्ता धोरण, एनपीएसमधील कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शन योजनेत परतण्याचा पर्याय उपलब्ध करुन द्याव्यात या देखील बँक कर्मचाऱ्यांच्या मागण्या आहेत. वित्त मंत्रालयानं बँक कर्मचाऱ्यांनी संपाचा मार्ग स्वीकारु नये असं म्हटलं आहे. चर्चेतून प्रश्न सोडवण्याचं आवाहन केलं आहे. पीएलआय योजना दीर्घ चर्चेनंतर या महिन्याच्या सुरुवातीलाच मागं घेतली गेली असल्याचं देखील वित्त मंत्रालयाकडून सांगण्यात आलं आहे.

## थोडक्यात

### इराणशी युद्ध संपविणार नाही

**न्यूयॉर्क :** अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबतचा संघर्ष संपवण्याचा आणि स्ट्रेट ऑफ होर्मुझ (होर्मुझची सामुद्रधुनी) खुला करण्याचा प्रस्ताव फेटाळून लावला आहे. ट्रम्प यांनी शनिवारी सांगितले की, इराण अडचणीत आहे आणि म्हणूनच त्यांना स्ट्रेट ऑफ होर्मुझ त्वरित खुला करायचा आहे. व्हाईट हाऊसबाहेर पत्रकारांशी बोलताना ट्रम्प म्हणाले की, इराणला करार करायचा आहे कारण त्यांची मोठी पीछेहाट होत आहे आणि त्यांचे उत्पन्नाचे स्रोत आटले आहेत. त्यांनी नमूद केले की, इराणचे उत्पन्न स्ट्रेट ऑफ होर्मुझमधून होणाऱ्या व्यापारावर अवलंबून आहे. त्यांनी दावा केला की, अमेरिकेने या सागरी मार्गावर लष्करी इतिहासातील सर्वात मोठी नौदल नाकेबंदी लागू केली आहे आणि त्यांनी याची तुलना एका लोखंडी भिंतीशी केली. दरम्यान, इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी रविवारी सांगितले की, या संघर्षावर केवळ संवादातूनच तोडगा काढता येऊ शकतो.
परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांच्या माध्यमातून इराणने कतारमार्फत अमेरिकेला सात दिवसांचा कृती आराखडा (रोडमॅप) सादर केला. या प्रस्तावात काही विशिष्ट अटींची पूर्तता झाल्यानंतर शत्रुत्व थांबवणे आणि स्ट्रेट ऑफ होर्मुझ पुन्हा खुला करणे, अशा योजनांचा समावेश होता. या प्रस्तावात सुरुवातीला शत्रुत्व थांबवणे आणि इराणच्या तेलाच्या विक्रीवर लादण्यात आलेले निर्बंध शिथिल करणे, या गोष्टींची मागणी करण्यात आली होती.

# नासिर ढाब्याजवळ कार पलटी : एकाचा मृत्यू; तिघे जखमी

## सावनेर-भोपाळ मार्गवर अपघात, कारच्या धडकेनंतर चालकाचे नियंत्रण सुटले





**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**
सावनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सावनेर-खापरखेडा मार्गावर नासिर ढाब्याजवळ रविवारी (दि. २७) दुपारी १२ वाजताच्या सुमारास कार पलटी होऊन अपघात झाला. या अपघातात विजय बिंदेश्वर सिंग (वय ४२, रा. मिलन चौक, चपकापूर, खापरखेडा) यांचा मृत्यू झाला, तर अन्य तिघे जखमी झाले. जखमींमध्ये कारमधील दोघांचाही समावेश आहे. अपघातानंतर सर्व जखमींना सावनेर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

**महामार्गाच्या कडेला थांबले असताना कारची धडक**
प्राथमिक माहितीनुसार, खापरखेडा येथील चौघे दोन दुचाकींवरून हेटी गावासमोर प्लॉट पाहण्यासाठी जात होते. प्रवासादरम्यान नासिर ढाब्याजवळ महामार्गाच्या कडेला ते लघुशंकेसाठी थांबले होते. याचवेळी त्या मार्गाने जाणाऱ्या कारने विजय बिंदेश्वर सिंग यांना धडक दिली. धडकेनंतर कारचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर कार महामार्गाच्या दुभाजकावर आदळून पलटी झाली.
या अपघातात विजय बिंदेश्वर सिंग गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी मदतकार्य सुरू करण्यात आले. जखमींना तातडीने सावनेर येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी विजय बिंदेश्वर सिंग यांना मृत घोषित केले.

**सामाजिक कार्यकर्ते आणि महामार्ग पोलिसांची मदत**
अपघाताची माहिती मिळताच सामजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांनी महामार्ग सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत कोळी यांना घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच हितज्योती आधार फांउडेशनचे पथक आणि महामार्ग पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमींना रुग्णालयात पोहोचविण्यास मदत केली. त्यांच्या मदतीने जखमींना वेळेत उपचाराकरीता रुग्णालयात दाखल करण्यात आले.

**कारमधील दोघांसह तिघे जखमी**
अपघातग्रस्त कारचा क्रमांक MP 04 TA 8406 असून, ती कृष्णदेव भुजवा (वय २६, रा. भोपाल) चालवत असल्याची प्राथमिक माहिती आहे. या अपघातात विजय सुंदरलाल डहरवाल (वय ४८, रा. चर्पकापूर, खापरखेडा) तसेच कारमधील संध्या प्रदीप वेधी (वय ५९) आणि प्रदीप वेधी (वय ६८), दोघेही रा. भोपाल, जखमी झाले आहेत. तिघांनाही उपचारासाठी सावनेर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.
मृत व्यक्ती खापरखेडा वीज केंद्रात कंत्राटी कामगार कार्यरत होत. मृत विजय बिंदेश्वर सिंग हे खापरखेडा वीज केंद्रात रवी एनर्जी कंपनीच्या माध्यमातून कंत्राटी कामगार म्हणून कार्यरत होते. ते कोळशाचे नमुने गोळा करण्याचे काम करीत होते. त्यांचे वास्तव्य मिलन चौक, चपकापूर, खापरखेडा येथे होते. दरम्यान, अपघातग्रस्त कारचा विमा संपलेला असल्याची माहिती समोर आली आहे. या बाबीची अधिकृत पडताळणी होणे आवश्यक आहे.
सदर अपघाताची नोंद सावनेर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, अपघाताचे नेमके कारण आणि अन्य बाबीचा पुढील तपास सावनेर पोलीस करीत आहेत.

# नेपाळमध्ये पुन्हा भूस्खलनाचा थरकाप, थायलंडमध्येही महापुराचा कहर

## बँकॉकसह ५० जिल्ह्यात आणीबाणी, हजारो कार पाण्यात, रस्त्यांवर साप फिरू लागले



**वृत्तसंस्था, नेपाळ**
पूर आणि भूस्खलन, सोबतच मुसळधार पावसामुळे नेपाळमधील परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. आतापर्यंत सहा जणांचा मृत्यू झाला आहे. बागलुंग जिल्ह्यात भूस्खलनामुळे एक घर ढिगाऱ्याखाली गाडले गेले. या अपघातात एक महिला आणि तिच्या तीन मुलांचा मृत्यू झाला. पाल्पा जिल्ह्यात दोन जणांचा मृत्यू झाला. दरम्यान, पूर आणि भूस्खलनाने अनेक घरे आणि पूल वाहून नेले आहेत. अनेक ठिकाणी महामार्ग बंद असल्याने वाहतूक विस्कळीत झाली आहे. बुटवलमधील पूरग्रस्त भागातून हजारहून अधिक लोकांना बाहेर काढण्यात आले आहे. यापूर्वी, २६ ऑगस्ट रोजी भोटेकोशी नदीला आलेल्या पुरामुळे १,४५३ लोकांचा बळी गेला होता, तर ५,५०० हून अधिक लोक अजूनही बेपत्ता आहेत.

**जलविद्युत प्रकल्प बंद, पिकांचे नुकसान**
पुरामुळे वीज निर्मितीवरही परिणाम झाला असून, अनेक जलविद्युत प्रकल्पांमधील वीज निर्मिती थांबवावी लागली आहे. यामध्ये १४० मेगावॅट कालीगंडकी, २५ मेगावॅट अप्पर माडी, ४४ मेगावॅट सुपर माडी, २० मेगावॅट नामारजून माडी आणि ४० मेगावॅट सेती रिव्हर प्रकल्पाचा समावेश आहे. २२०-किलोव्होल्ट कालीगंडकी कॉरिडॉर पारेषण वाहिनीचे दोन टॉवर कोसळले. अनेक ठिकाणी पारेषण आणि वितरण वाहिन्यांचेही नुकसान झाले. अनेक भागांमध्ये शेतात पाणी शिरल्याने पिकांचे नुकसान झाले आहे.

**बँकॉकमध्ये पुराची परिस्थिती अधिकच गंभीर**
दुसरीकडे, मुसळधार पावसानंतर थायलंडची राजधानी बँकॉकमध्ये पुराची परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. रस्ते पाण्याखाली गेल्याने गाड्या आणि बसेस पाण्यात बुडाल्या. अनेक भागांमध्ये लोकांना कमरेपर्यंतच्या पाण्यातून चालावे लागले. दरम्यान, पुराच्या पाण्यात साप दिसल्याचे फोटो आणि व्हिडिओ समोर आले आहेत. प्रशासनाने ५० जिल्ह्यांमध्ये आणीबाणी जाहीर केली आहे. बँकॉकमधील पूरसंकट गंभीर झाल्याने, थायलंडचे पंतप्रधान अनुतिन चर्नविराकुल यांनी आपला लंडन दौरा अर्धवट सोडून देशात परतले.

# सरकारच्या तिजोरीवर पहिला हक्क शेतकऱ्यांचा !

## अचूक पंचनाम्यांना सर्वोच्च प्राधान्य : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे





**दै. सिंहवाणी वृत्त, वर्धा**
सरकारच्या तिजोरीवर पहिला हक्क शेतकऱ्याचाच आहे, या भूमिकेतून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य सरकारने तयारी सुरू केली असून, अचूक पंचनामे पूर्ण करून एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, याला सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी रविवारी वर्धा येथे स्पष्ट केले.
केंद्र सरकारच्या मदतीची वाट न पाहता राज्य सरकार स्वतःच्या तिजोरीतून शेतकऱ्यांना मदत करण्याच्या भूमिकेत असल्याचेही त्यांनी सांगितले.
वर्धा येथे दुष्काळी परिस्थितीची पाहणी केल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना बावनकुळे म्हणाले की, राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन परिस्थितीची पाहणी केली असून दुष्काळ जाहीर करण्याबरोबरच त्यावरील उपाययोजनांबाबतही निर्णय घेतला आहे. सध्या पंचनामे आणि पीक पाहणी सुरू असून एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, याची काळजी घेतली जात आहे.
दुष्काळाच्या काळात खरीप आणि रब्बी हंगामासोबतच पिण्याचे पाणी व जनावरांच्या चाऱ्याचा विचार करावा लागणार आहे. त्यामुळे विकासकामांच्या प्राधान्यक्रमापेक्षा शेतकऱ्यांना मदत करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. सरकारच्या तिजोरीवर पहिला हक्क शेतकऱ्याचा आहे, अशी भूमिका मुख्यमंत्र्यांनी घेतल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.
वर्धा जिल्ह्यातील कारंजा तालुका दुष्काळाच्या निकषात बसला नसला, तरी प्रत्यक्ष पंचनामा केल्यास तेथील परिस्थिती अडचणीची असल्याचे समोर येऊ शकते. एमआरचा अहवाल आणि गुगल इमेजेसच्या आधारेही परिस्थितीचा आढावा घेऊन निर्णय केला जाईल, असे बावनकुळे यांनी सांगितले.
दुष्काळाच्या उपाययोजनांसाठी मुख्यमंत्र्यांनी आपल्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यांची मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन केली आहे. या समितीची बैठक प्रत्येक मंगळवारी सायंकाळी पाच वाजता होणार असून मुख्य सचिव या समितीचे सचिव आहेत. राज्यातील दुष्काळाच्या परिस्थितीत आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याची तयारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.
पंचनामे पूर्ण झाल्यानंतरच मदतीबाबत निर्णय घेता येईल, असे सांगताना बावनकुळे म्हणाले की, पंचनामे अचूक होणे महत्त्वाचे आहे. राज्य सरकारने मदत जाहीर केली, मात्र संबंधित शेतकऱ्याचा अचूक पंचनामा झाला नाही, तर प्रत्यक्ष मदत देण्यात अडचण निर्माण होऊ शकते. त्यामुळे पंचनाम्याच्या प्रक्रियेला प्राधान्य देण्यात आले आहे. यासाठी मंत्री, आमदार, खासदार आणि अधिकारी क्षेत्रात काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.
दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू थांबवणे आणि त्यांना या परिस्थितीतून बाहेर काढणे ही सरकारची प्राथमिकता असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकरी आत्महत्येसारखी परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी सरकारची जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.
दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आणि वैयक्तिक स्वरूपाचे कार्यक्रम अत्यंत कमी खर्चात करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वाढदिवस, सत्कार समारंभ, पुष्पगुच्छ आणि हार यावरील अनावश्यक खर्च टाळून तो निधी मुख्यमंत्री सहायता निधीत देण्याचे आवाहनही बावनकुळे यांनी केले.
राज्यातील उद्योगपती आणि व्यापाऱ्यांनीही मुख्यमंत्री सहायता निधीत जास्तीत जास्त मदत करावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच सीएसआरच्या माध्यमातून तलावांचे खोलीकरण, जलयुक्त शिवारच्या योजना, जलसंधारणाचे प्रकल्प, मालगुजारी तलाव, साठवण तलाव आणि शिवकालीन तलाव व बंधारे यांची कामे करता येऊ शकतात, असे त्यांनी सांगितले.
वर्धा जिल्ह्यातील ६ हजारांहून अधिक वॉटर बॉडींची कामे, नदी-नाल्यांचे सरळीकरण आणि रिचार्ज शाफ्टच्या माध्यमातून पाणी साठवणूक करण्यावर भर देता येईल. पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, भूजलपातळी वाढवणे आणि पुढील काळात शेतकऱ्यांना पुरेसे पाणी उपलब्ध होईल अशी व्यवस्था उभी करणे, हीदेखील सरकारची प्राथमिकता असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.
दुष्काळाच्या परिस्थितीत वीजपुरवठ्याशी संबंधित बाबींवरही लक्ष द्यावे लागणार आहे. ट्रान्सफॉर्मर आणि डीपी निकामी होण्याची शक्यता असल्याने महावितरणला त्याकडे लक्ष द्यावे लागेल. जलसंधारणासोबतच वीजपुरवठ्याशी संबंधित उपाययोजनांनाही प्राधान्य द्यावे लागणार असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.
दुष्काळाच्या नावाने राजकारण न करता सत्ताधारी आणि विरोधी पक्षांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहावे, असे आवाहनही त्यांनी केले. सरकारच्या भूमिकेबाबत काही अडचणी किंवा सूचना असतील तर विरोधी पक्षाने त्या मांडाव्यात; मंत्रिमंडळ उपसमितीमध्ये त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची तयारी असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र शेतकऱ्यांच्या मनात संभ्रम, अनास्था किंवा भीतीचे वातावरण निर्माण होणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

संपादकीय लेखणीतून...

# पर्यटन आणि नोकरीची संधी

जागतिक पर्यटन दिन दरवर्षी २७ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. याचा उद्देश जागतिक स्तरावर पर्यटनाचे महत्त्व आणि त्याचा आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यावरणीय परिणाम यावर प्रकाश टाकणे आहे. संयुक्त राष्ट्रांच्या पर्यटन संघटनेने- युएनडब्ल्पूटीओने हा दिवस सन १९८० मध्ये प्रथम साजरा करण्यास सुरुवात केली. पर्यटन उद्योग हा जगातील सर्वात वेगाने वाढणारा क्षेत्र असून तो रोजगार निर्मिती, आर्थिक वाढ, आणि सांस्कृतिक आदानप्रदानाचा प्रमुख स्रोत आहे. पर्यटनाने वेगवेगळ्या संस्कृती, परंपरा, आणि निसर्गाचे सौंदर्य अनुभवण्याची संधी मिळते. या दिवसाचे महत्त्व वाढते कारण पर्यटनामुळे जागतिक एकात्मता वाढते आणि विविध देशांमधील परस्पर समजूतदारपणा वाढतो. सन २०२३ च्या जागतिक पर्यटन दिनाचा थीम होता पर्यटन आणि हरित गुंतवणूक, ज्यामुळे शाश्वत आणि पर्यावरणपूरक पर्यटनाला प्रोत्साहन दिले जात आहे.

दरवर्षी २७ सप्टेंबर हा दिवस जगभरात जागतिक पर्यटन दिन म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्राच्या जागतिक पर्यटन संस्था- पुएनडब्ल्यूटीओची स्थापन दि.२७ सप्टेंबर १९७० रोजी झाली. या दिवसाचे महत्त्व लक्षात घेऊन १९८० पासून अधिकृतपणे हा दिवस साजरा करण्यास सुरुवात झाली. पर्यटन क्षेत्राचा जागतिक स्तरावर प्रचार करणे आणि संस्कृतींची देवाणघेवाण वाढवणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. पर्यटनामुळे देशाच्या आणि स्थानिक पातळीवरील अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळते. हॉटेल, परिवहन, मार्गदर्शक आणि हस्तकला उद्योगात अनेक नवीन रोजगार निर्माण होतात. नवनवीन ठिकाणच्या संस्कृती, खाद्यान्न आणि परंपरांची माहिती मिळते. यामुळे जगभरात बंधुभाव वाढतो.

आज २७ सप्टेंबर हा दिवस जागतिक पर्यटन दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. सन १९८० पासून जागतिक पर्यटन दिन याच दिवशी साजरा करण्यास सुरुवात झाली, कारण संयुक्त राष्ट्राच्या जागतिक पर्यटन संस्थेची स्थापना १९७० मध्ये याच दिवशी झाली होती. सन २०१८मध्ये 'पर्यटन आणि डिजिटल परिवर्तन' हे मुख्य उद्दिष्ट ठेवून पर्यटन दिन साजरा केला गेला. पूर्ण वर्षभर जगभरातील सर्व देशांनी त्यासाठी वेगवेगळे कार्यक्रम, योजना, सुविधा यांचे नियोजन केले. तर सन २०१९ साली पर्यटनदिनासाठी विषय होता तो म्हणजे पर्यटन क्षेत्रातील कारकीर्दः ज्यांना मुक्त भटकायची, मनमुराद फिरायची आवड आहे अशांना पर्यटन क्षेत्रात कारकीर्द करणे सहज शक्य झाले आहे. आवडीची कारकीर्द झाल्यास मिळणारा आनंद मोठा असतो. दळवळणाच्या सुविधा वाढल्याने मुक्तसंचार करणे आता सोपे झाले आहे. देशाच्या कुठल्याही प्रदेशात किंवा परदेश गमन करण्याकडे अलीकडे लोकांचा कल वाढू लागला आहे. वर्षभरात पर्यटन या क्षेत्रात २५ टक्क्याने वाढ होते. पर्यटन व्यवस्थापन आणि नियोजन या अभ्यास शाखाही आता महाविद्यालयीन शिक्षणात आल्या आहेत. अनेक परदेशी पर्यटन कंपन्या या क्षेत्रात गुंतवणूक करत आहेत. देशातही मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होतो आहे.

ट्रॅव्हल आणि टुरिझम या विषयात पदवीसाठी बारावी पास आणि पदव्युत्तर पदवीसाठी कोणत्याही विषयातील पदवी आवश्यक आहे. या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी फिरण्याची आवड असायला हवी, तसेच संवाद कौशल्य उत्तम असणे आणि दोनपेक्षा अधिक भाषेवर प्रभुत्व असायला हवे. काही परदेशी भाषा आत्मसात असल्यास खूप फायद्याचे ठरते. भौगोलिक प्रदेशांची उत्तम जाण असायला हवी. सहकार्यवृत्ती आणि प्रतिकूल परिस्थिती हाताळण्याचे कौशल्य असेल तर लोकांमध्ये पटकन एकरूप होणे सोपे होते. सामाजिक नितीनियमांचा आणि परंपरांचा आदर करणेही गरजेचे असते. त्याचबरोबर त्या देशाचा इतिहास, कला आदीची प्राथमिक माहिती हवी. निवास, वाहतूक, अन्न, समारंभ, साहसी पर्यटन आदी सेवा देणारे हे क्षेत्र आहे. तुमच्या आवडीनिवडीनुसार यातील अनेक विभागातही काम करता येईल. स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून पर्यटन विभागात नोकरीच्या संधी मिळतात. पर्यटन संचालनालयाच्या माध्यमातूनही अनेक पदे भरली जातात. सरकारी नोकरीत येण्यासाठी मात्र या विषयातील पदवीप्राप्त असणे गरजेचे आहे. तसेच अनेक परदेशी कंपन्यात संधीही आहेत. अनेक विमानसेवा प्रदान करणाऱ्या कंपन्यांना या क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते. खाजगी समूहात व्यवस्थापन आणि आदी बाबींसाठी उत्तम वेतनही मिळते. पर्यटन विभागः आरक्षण, विपणन, विक्री, नियोजन, मार्गदर्शन यासाठी अनेक जागा भरल्या जातात. हा उपलब्ध पर्यटनसंबंधी जागा आणि तिथे मिळणाऱ्या सेवांची तपशीलवार माहिती देण्याचे काम करतो. त्याच्या सहकायार्मुळे प्रवाशांना योग्य नियोजन करण्यास मदत होते. पर्यटन मंत्रालय गाईडला मान्यता देते. प्रादेशिक, राज्य आणि स्थानिक असे तीन प्रकार त्यात पडतात. या परवान्याचे दर दोन वर्षांनी नूतनीकरण करता येते.

स्थळांची सविस्तर आणि इत्यंभूत माहिती देणे आणि सांस्कृतिक परंपरा आदीची माहिती देण्याचे काम गाईड करत असतो. त्याच्याकडे उत्तम संवाद कौशल्य असायला हवे, कारण तो प्रत्यक्ष स्थळांवर जाऊन मार्गदर्शन करत असतो. एकंदरीत गाईड हा महत्त्वाचा दुवा असतो. हे प्रवासाचे संपूर्ण नियोजन करतात. टूर गाईड म्हणून अनुभव आल्यानंतर या पदावर काम करता येते. यांचे अनेक लोक ग्राहकांना एजन्सीशी जोडतात. आता ऑनलाइनही ग्राहक जोडता येतात. ग्राहकांशी संवाद साधून अनेक प्लॅन ते देत असतात आणि ग्राहकांना कंपनीशी संपर्क करून देतात. पर्यटन आणि हॉटेल क्षेत्र या दोन्हींचा संबंध अनन्यसाधारण आहे. प्रवासात मुक्कामाची सोय करण्याचे काम एकमेकांच्या सहाय्याने केले जाते. यावर आकर्षक सवलती देऊन ग्राहक मिळवण्याकडे कल असतो. जवळजवळ एक लाख कुशल मनुष्यबळाची गरज या व्यवसायाला सध्या आहे. विमान कंपन्यासाठी काम करणेही वेगळा आनंद देणारी संधी असते. इतर व्यवस्थापन अभ्यासक्रम पूर्ण असल्यास प्राधान्याने संधी मिळते. त्याचबरोबर आकर्षक वेतनही दिले जाते.

# एक देश, एक प्रवर्ग : बंजारा समाजाचा घटनात्मक हक्कासाठी दीर्घ संघर्ष

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

महाराष्ट्रातील बंजारा समाज (गोर बंजारा) हा अत्यंत समृद्ध संस्कृती, गौरवशाली इतिहास आणि वैशिष्ट्यपूर्ण जीवनशैली असलेला समाज आहे. एकेकाळी संपूर्ण भारतात व्यापारासाठी भटकंती करणारा हा समाज आता महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये स्थायिक झाला आहे. आजच्या आधुनिक काळात त्यांच्या दैनिक जीवनात परंपरा आणि आधुनिकतेचा सुरेख संगम पाहायला मिळतो.मात्र हा समाज आजही मागासलेला असून शेती,शेतमजुरी, ऊस तोड कामगार म्हणून राबत आहे.

सध्या बहुतांश बंजारा बांधव स्थायिक शेतकरी आहेत. शेतीसोबतच गायी, बैल आणि म्हशी पाळणे (पशुपालन) हा त्यांच्या दैनिक दिनचर्येचा मोठा भाग आहे. कोरड्या दुष्काळी भागातील किंवा भूमिहीन कुटुंबांना रोजगारासाठी दरवर्षी ऊसतोडणीच्या हंगामात किंवा इतर मजुरीसाठी स्थलांतर करावे लागते. महाराष्ट्रातील बंजारा समाज सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या आजही मोठ्या प्रमाणावर मागासलेला आहे. हा समाज प्रामुख्याने दुर्गम भागात आणि गावाबाहेर 'तांड्यांवर' राहतो.

अनेक तांड्यांवर अजूनही पक्के रस्ते, पिण्याचे पाणी, आरोग्य आणि रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध नाहीत. शेतजमीन आणि उत्पन्नाची शाश्वत साधने नसल्यामुळे बहुतांश कुटुंबे हलाखीत जीवन जगत आहेत. रोजगारासाठी बंजारा समाजातील कुटुंबांचे मोठ्या प्रमाणावर ऊसतोडणी किंवा इतर मजुरीच्या कामांसाठी हंगामी स्थलांतर होते, ज्याचा थेट परिणाम मुलांच्या शिक्षणावर होतो जात एकच मात्र प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या प्रवर्गात या जातीचा समावेश करण्यात आल्याने या समुदायाने एस टी प्रवर्गात समाविष्ट करण्याची मागणी करत आहे.एक देश, एक प्रवर्ग' ही बंजारा समाजाची संपूर्ण देशभरात एकाच संवैधानिक प्रवर्गात (प्रामुख्याने अनुसूचित जमाती - ST) समावेश करण्याची जुनी आणि अत्यंत महत्त्वाची मागणी आहे. हा लढा केवळ आरक्षणाचा नसून, तो बंजारा समाजाच्या घटनात्मक हक्कांचा, अस्मितेचा आणि दीर्घकालीन संघर्षाचा भाग आहे.

बंजारा समाजाचे मागासलेपणा व मिळणारे अल्प आरक्षण. यामुळे आजही हा समाज विकासापासून कोसो दूर आहे,म्हणून हा समाज इतर राज्यात मिळणाऱ्या एस टी प्रवगार्ची मागणी करत आहे.महाराष्ट्रात बंजारा समाजाचा समावेश सध्या विमुक्त जाती 'अ' (VJ-A / NT-A) प्रवर्गात करण्यात आला आहे. बंजारा समाजाची संस्कृती, बोलीभाषा आणि राहणीमान हे पूर्णपणे आदिवासी निकषांना पूरक असल्याचा दावा समाज संघटनांकडून केला जातो. 'हैदराबाद गॅझेटियर'चा आधार घेत बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गात आरक्षण मिळावे, यासाठी राज्यभरात मोर्चे आणि आंदोलने तीव्र झाली आहेत. ३% (या प्रवर्गात बंजारा आणि पारधीसह एकूण १४ जातींचा समावेश आहे). ३टक्के आरक्षणात १४ जाती समाविष्ट असल्याने मिळणारे आरक्षण हे तुटपुंजे आहे, त्यामुळे महाराष्ट्रातील बंजारा समाजाला तेलंगणा, आंध्र प्रदेशच्या धर्तीवर अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट करून ७ टक्के आदिवासी आरक्षण द्यावे, अशी समाजाची प्रमुख मागणी आहे. जात एकच मात्र प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या प्रवर्गात असा समाज म्हणजे बंजारा.

बंजारा (गोर बंजारा/लमाण) हा असा एक ऐतिहासिक आणि समृद्ध संस्कृती असलेला समाज आहे, ज्यांची भाषा (गोरबोली), वेशभूषा, परंपरा आणि संस्कृती संपूर्ण देशभरात एकच आहे; मात्र वेगवेगळ्या राज्यांच्या भौगोलिक आणि सामाजिक परिस्थितीनुसार त्यांना वेगवेगळ्या आरक्षण प्रवर्गात (SC/ST/OBC/VJ-NT) समाविष्ट करण्यात आले आहे.

ब्रिटिशांनी १८७१ मध्ये बंजारा समाजाला 'गुन्हेगार जमाती कायदा' अंतर्गत आणले होते. स्वातंत्र्यानंतर हा कायदा रद्द होऊन समाज 'विमुक्त' झाला, ज्यामुळे अनेक राज्यांत त्यांना विमुक्त किंवा भटक्या जमातीचा (VJNT) दर्जा मिळाला. तत्कालीन हैदराबाद संस्थानात (ज्यामध्ये मराठवाडा, तेलंगण आणि कर्नाटकचे काही भाग होते) बंजारा समाजाची नोंद आदिवासी/जमात म्हणून होती. यामुळेच आंध्र-तेलंगणमध्ये त्यांना 'ST' दर्जा मिळाला, तर महाराष्ट्रातील बंजारा समाजही याच ऐतिहासिक नोंदींच्या आधारे सध्या 'ST' (अनुसूचित जमाती) दर्जाची मागणी करत आहे. वेगवेगळ्या राज्यांत या समाजाला लमाणी, लंबाडी, सुकली, नायक, बाजीगर किंवा लमाण अशा विविध नावांनी ओळखले जाते. या प्रादेशिक ओळखींमुळेही केंद्र आणि राज्य स्तरावर त्यांच्या प्रवर्गात तफावत निर्माण झाली आहे

महाराष्ट्रात हा समाज विमुक्त जाती (VJNT/SBC) व ओबीसी प्रवर्गात येतो. तसेच छत्तीसगड, गुजरात, मध्य प्रदेश आणि राजस्थान या राज्यांत त्यांना ओबीसी प्रवर्गात स्थान आहे.तर आंध्र प्रदेश, तेलंगणा, ओडिशा, बिहार आणि झारखंड, कर्नाटक, दिल्ली, हरियाणा, हिमाचल प्रदेश आणि पंजाब यांसारख्या राज्यांत हा समाज अनुसूचित जाती प्रवर्गात समाविष्ट केला गेला आहे.इतर राज्याच्या धर्तीवर या समाजाला एस टी प्रवर्गात सामावून घ्यावी,अशी मागणी या समुदायाची आहे.देशभरात विखुरलेल्या या समाजाला एकाच प्रकारचा घटनात्मक दर्जा मिळावा ("वन नेशन, वन कॅटेगरी"), यासाठी बंजारा समाज दीर्घकाळापासून संघर्ष करत आहे

मराठा समाजाला जर हैदराबाद गॅझेट' नुसार ओबीसी चे प्रमाणपत्र मिळत असताना महाराष्ट्रातील बंजारा समाजामध्ये एस टी प्रवगार्तून आरक्षण मिळावे,अशी मागणी या समुदायाची आहे.महाराष्ट्रात बंजारा समाजाला एस.टी. प्रवर्गात समाविष्ट करावे या मागणीसाठी तीव्र आंदोलने झाली. या मागणीच्या अभ्यासासाठी महाराष्ट्र शासनाने फेब्रुवारी २०२६ मध्ये निवृत्त न्यायमूर्ती एम. एल. तहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना केली आहे. तेलंगणा व आंध्र प्रदेशप्रमाणे महाराष्ट्रातही ऐतिहासिक कागदपत्रे आणि हैदराबाद गॅझेटच्या आधारावर आदिवासी दर्जा मिळावा, अशी समाजाची प्रमुख भूमिका आहे.

काही तज्ज्ञांच्या मते, संविधानातील तरतुदींनुसार एखाद्या जातीचे वर्गीकरण हे त्या-त्या राज्यातील त्यांची सामाजिक, शैक्षणिक मागासलेपण आणि भौगोलिक अलगीकरण या स्थानिक निकषांवर (उदा. लोकूर समितीचे निकष) ठरवले जाते. त्यामुळे संपूर्ण देशासाठी सरसकट एकच प्रवर्ग लागू करणे कायदेशीर व तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीचे मानले जाते.

**स्थानिक विरोध :** जर महाराष्ट्रासारख्या राज्यात बंजारा समाजाला 'एसटी' प्रवर्गात समाविष्ट केले, तर तिथल्या आधीच्या मूळ आदिवासी जमातींच्या (उदा. भिल्ल, गोंड) आरक्षणाच्या कोट्यावर त्याचा परिणाम होऊ शकतो. यामुळे स्थानिक पातळीवर इतर आदिवासी संघटनांकडून या मागणीला विरोध दर्शवला जातो.

- ९५६१५९४३०६

# २०२६ आशियाई क्रीडा स्पर्धा: नेपाळ क्रिकेट संघाची ऐतिहासिक कामगिरी, अफगाणिस्तानला नमवून गाठली उपांत्यपूर्व फेरी

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

२०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेटच्या मैदानात नेपाळच्या संघाने अभूतपूर्व कामगिरी करत क्रीडाविश्वाचे लक्ष वेधून घेतले आहे. कोरोगी स्पोर्ट्स क्लब येथे खेळल्या गेलेल्या 'अ' गटाच्या सामन्यांमध्ये नेपाळने उत्कृष्ट सांघिक खेळ, अचूक गोलंदाजी आणि संयमी फलंदाजीच्या जोरावर उपांत्यपूर्व फेरीत दिमाखात प्रवेश मिळवला. बलाढ्य अफगाणिस्तानविरुद्धचा ऐतिहासिक विजय आणि जपानविरुद्धच्या अनिर्णित सामन्यातून मिळालेला गुण यांच्या जोरावर नेपाळने ३ गुणांसह आपल्या गटात अव्वल स्थान पटकावले.

### अफगाणिस्तानविरुद्ध मोठा उलटफेर: अचूक गोलंदाजी आणि संयमी पाठलाग

स्पर्धेतील सर्वात मोठा उलटफेर शुक्रवारी पाहायला मिळाला, जेव्हा नेपाळने अफगाणिस्तानचा ५ गडी राखून पराभव केला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा अफगाणिस्तानचा निर्णय नेपाळच्या गोलंदाजांनी पूर्णपणे चुकीचा ठरवला.

**अफगाणिस्तानची फलंदाजी ढेपाळली:** नेपाळच्या धारदार गोलंदाजीसमोर अफगाणिस्तानचे आघाडीचे फलंदाज निष्प्रभ ठरले. मोहम्मद अक्रम (२), करीम जन्नत (९) आणि हसन ऐसाखिल (०) झटपट बाद झाल्याने संघाची अवस्था बिकट झाली. त्यानंतर फैसल शिनोझादा (३३ चेंडूंत ३० धावा) आणि नजीबुल्लाह झाद्रान (४० चेंडूंत ३० धावा) यांनी चौथ्या विकेटसाठी ३९ धावांची भागीदारी करत डाव सावरण्याचा प्रयत्न केला. मात्र, हे दोघे बाद झाल्यानंतर फलंदाजी पुन्हा गडगडली. कर्णधार दरविश रसूली शून्यावर तर मोहम्मद इशाक ७ धावांवर बाद झाला. अखेरच्या षटकांत खरोटीने नाबाद १७ धावांची खेळी केल्याने अफगाणिस्तानला २० षटकांत ७ गडी गमावून १०२ धावांपर्यंत मजल मारता आली.

**नेपाळची प्रभावी गोलंदाजी:** कुशार भुरतेलने अप्रतिम मारा करत सर्वाधिक ४ बळी टिपले, तर ललित राजबोंगशीने ३ गडी बाद करत अफगाणिस्तानच्या धावगतीला वेसण घातली.

**दडपणाखाली नेपाळचा संयमी विजय:** १०३ धावांच्या माफक लक्ष्याचा पाठलाग करताना नेपाळची सुरुवातही अत्यंत खराब झाली. कुशार भुरतेल (०), आसिफ शेख (२) आणि कुशार मल्ला (९) स्वस्तात परतल्याने नेपाळ संकटात सापडला होता. अशा स्थितीत संदीप जोरा (३४ धावा) आणि कर्णधार रोहित पौडेल यांनी चौथ्या विकेटसाठी २५ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. जोरा बाद झाल्यानंतर पौडेलने दीपेंद्र सिंग ऐरी (१५ धावा) सोबत ४६ धावा जोडल्या. अखेर कर्णधार रोहित पौडेलने ३२ चेंडूंत नाबाद ३३ धावांची परिपक्व खेळी करत गुलशन झाच्या साथीने १७.२ षटकांत ५ गडी गमावून विजय साकार केला.

**जपानविरुद्धचा सामना: फलंदाजांची फटकेबाजी, पावसामुळे गुणविभागणी**

गटातील दुसऱ्या सामन्यात जपानविरुद्ध नेपाळच्या फलंदाजांनी आक्रमक रूप धारण केले होते. प्रथम फलंदाजी करताना नेपाळने अवघ्या १५ षटकांत ४ बाद १४९ धावांचा डोंगर उभा केला.

**जोरा आणि बामची शानदार अर्धशतके:** या डावात संदीप जोरा आणि लोकेश बाम यांनी उत्कृष्ट फटकेबाजीचे प्रदर्शन केले. दोघांनीही नाबाद अर्धशतके झळकावत संघाला मजबूत स्थितीत आणून ठेवले. संदीप जोराने नाबाद ५७ धावा आणि लोकेश बामने नाबाद ५२ धावांची खेळी केली.

**पावसाचा व्यत्यय:** नेपाळचा डाव संपल्यानंतर जोरदार पाऊस सुरू झाल्यामुळे दुसऱ्या डावातील एकही चेंडू टाकला जाऊ शकला नाही. अखेर सामना रद्द (अनिर्णित) घोषित करण्यात आला आणि दोन्ही संघांना प्रत्येकी १ गुण विभागून देण्यात आला.




### 'अ' गटात अव्वल स्थान आणि उपांत्यपूर्व फेरीची वाटचाल

अफगाणिस्तानविरुद्धचा २ गुणांचा विजय आणि जपानविरुद्ध अनिर्णित सामन्यातून मिळालेला १ गुण, अशा एकूण ३ गुणांसह नेपाळने 'अ' गटात पहिले स्थान मिळवले. आंतरराष्ट्रीय स्तरावर कसोटी दर्जा असलेल्या अफगाणिस्तानसारख्या बलाढ्य संघाला धूळ चारणे आणि प्रतिकूल परिस्थितीत सातत्य राखणे, यामुळे नेपाळच्या क्रिकेटमधील प्रगती अधोरेखित झाली आहे. या विजयामुळे आत्मविश्वास उंचावलेला नेपाळ संघ आता उपांत्यपूर्व फेरीत पदकाच्या दिशेने पुढील पाऊल टाकण्यास सज्ज झाला आहे.

### अफगाण संघाची पिछेहाट का ?

गेल्या काही वर्षांत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये 'जायंट किलर' म्हणून ओळख निर्माण करणाऱ्या अफगाणिस्तान क्रिकेट संघाची अलीकडच्या काळातील कामगिरी चिंतेचा विषय ठरत आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत नेपाळसारख्या असोसिएट संघाकडून झालेला पराभव हा केवळ एक योगायोग नसून, संघाच्या वाढत्या अस्थिरतेचे आणि तंत्रातील त्रुटींचे स्पष्ट लक्षण मानले जात आहे.

### फलंदाजीतील सातत्याचा अभाव आणि संथ दृष्टिकोन

अफगाणिस्तानच्या पराभवाचे सर्वात मोठे कारण म्हणजे त्यांच्या आघाडीच्या आणि मधल्या फळीतील सातत्याचा अभावः

पॉवरप्लेमध्ये नांगी टाकणेः आधुनिक टी-२० क्रिकेटमध्ये सुरुवातीच्या ६ षटकांत आक्रमक सुरुवात करणे आवश्यक असते. मात्र, अफगाणिस्तानची आघाडीची फळी पॉवरप्लेमध्येच ढेपाळत असल्याचे सातत्याने दिसत आहे. नेपाळविरुद्ध मोहम्मद अक्रम, करीम जन्नत आणि हसन ऐसाखिल या आघाडीच्या तीन फलंदाजांनी मिळून केवळ ११ धावा केल्या.

स्ट्राइक रोटेशनची समस्याः मधल्या षटकांमध्ये एकेरी-दुहेरी धावा काढून धावफलक फिरता ठेवण्याऐवजी फलंदाज अनावश्यक डॉट बॉल्स खेळतात. फैसल शिनोझादा (३३ चेंडूंत ३०) आणि नजीबुल्लाह झाद्रान (४० चेंडूंत ३०) यांच्यासारख्या अनुभवी खेळाडूंनाही गती राखता आली नाही, ज्यामुळे संघावर धावगती वाढवण्याचा अवाजवी दबाव निर्माण होतो.

### प्रमुख खेळाडूंची अनुपस्थिती आणि 'बेंच स्ट्रेंथ'चा अभाव

अफगाणिस्तानच्या राष्ट्रीय संघाची ताकद अनेकदा त्यांच्या जागतिक दर्जाच्या स्टार खेळाडूंवर (जसे की राशिद खान, मोहम्मद नबी, मुजीब उर रहमान) अवलंबून राहिली आहेः

**दुसऱ्या फळीची अपरिपक्वताः** जेव्हा महत्त्वाच्या स्पर्धांमध्ये वरिष्ठ खेळाडू अनुपलब्ध असतात किंवा त्यांना विश्रांती दिली जाते, तेव्हा मैदानात उतरणारी राखीव फळी अपेक्षेप्रमाणे कामगिरी करू शकत नाही.

**दडपणाखाली निर्णयक्षमताः** नेपाळविरुद्ध केवळ १०२ धावांचा बचाव करताना अफगाणिस्तानच्या गोलंदाजांनी सुरुवातीला विकेट्स मिळवून चांगला दबाव निर्माण केला होता. परंतु, मोक्याच्या क्षणी सामन्यावर पकड मजबूत ठेवण्यात आणि सामन्याचा निकाल आपल्या बाजूने खेचण्यात कर्णधार दरविश रसूली आणि गोलंदाजी फळी कमी पडली.

### असोसिएट देशांमधील तीव्र स्पर्धा

अफगाणिस्तान ज्या मागार्ने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुढे आला, त्याच मार्गावर आता नेपाळ, नामिबिया, ओमान यांसारखे देश वेगाने पुढे येत आहेतः

**रणनीतीचा अभावः** असोसिएट संघ आता केवळ 'सहभागी' होण्यासाठी खेळत नसून प्रतिस्पर्ध्यांच्या ताकदीचा आणि कमकुवत बाजूंचा सखोल अभ्यास करून मैदानात उतरतात. नेपाळने अफगाणिस्तानच्या फिरकीविरुद्ध दाखवलेला संयम आणि अचूक गोलंदाजी हे त्याचेच उदाहरण आहे.

**अतिआत्मविश्वासः** वरिष्ठ किंवा कसोटी दर्जा असलेल्या संघांमध्ये असोसिएट देशांविरुद्ध खेळताना अनेकदा अतिआत्मविश्वास दिसून येतो, ज्याचा फटका थेट मैदानावरील निकालावर बसतो.

### संघटनात्मक व पायाभूत आव्हाने

मैदानावरील कामगिरीमागे मैदानाबाहेरील परिस्थितीचाही मोठा वाटा असतोः

देशांतर्गत क्रिकेटचे मर्यादित स्वरूपः स्थानिक पातळीवर दर्जेदार चार दिवसीय किंवा टी-२० स्पर्धांचे सातत्यपूर्ण नियोजन न होणे.

प्रवासातील अडथळे आणि होम ग्राउंडची कमतरताः स्वतःच्या देशात आंतरराष्ट्रीय सामने खेळण्याची संधी न मिळाल्यामुळे खेळाडूंना सतत परदेशी मैदानांवर जुळवून घ्यावे लागते, ज्यामुळे मानसिक आणि शारीरिक थकवा वाढतो.

अफगाणिस्तानकडे प्रतिभा आणि क्षमता यांची कमतरता नसली, तरी आधुनिक टी-२० क्रिकेटच्या बदलत्या शैलीनुसार रणनीती न बदलल्यास आणि मधल्या फळीतील पोकळी न भरून काढल्यास आगामी प्रमुख स्पर्धांमध्ये अशा प्रकारच्या उलटफेरांचा धोका कायम राहील. वास्तविक या गटातून दोन संघ उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरले आहे त्यात आफगाणिस्तानचाही समावेश आहे मात्र त्यांची कामगिरी निश्चितच समाधानकारक व आश्वासक नाही.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# शिक्षण आणि कौशल्यावर भर देऊन समाजाचा विकास साधा!

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आवाहन, चर्मकार सेवा संघातर्फे विद्यार्थ्यांचा सत्कार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कुठल्याही समाजाची प्रगती शिक्षणावर अवलंबून असते. उत्तम शिक्षण घेतले तर रोजगाराचे प्रश्न सुटू शकतात. सामाजिक प्रगती होत असते. विविध क्षेत्रांमध्ये प्रतिष्ठेचे स्थान मिळते आणि समाज मुख्य प्रवाहात येतो. त्यामुळे काळाची गरज ओळखून चर्मकार समाजाने देखील शिक्षण आणि कौशल्यावर भर देऊन आपला विकास साधायला हवा, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज, रविवार, दि. २७ सप्टेंबर रोजी केले.



स्व. भानुताई गडकरी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ चर्मकार सेवा संघातर्फे आयोजित विद्यार्थी सत्कार सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच भाजपचे शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी, आमदार कृष्णा खोपडे, चर्मकार सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष भैय्यासाहेब बिघाणे यांचीही व्यासपीठावर उपस्थिती होती. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी मी मदत करत असतो. हे माझे कर्तव्यच आहे. त्यामुळे या आयोजनाचे श्रेय मला देऊ नका, असे आवाहनही गडकरी यांनी आयोजकांना केली.

गडकरी म्हणाले, आपल्या समाजाची प्रगती व्हावी, अशी प्रत्येकाची भावना असते. पण प्रत्यक्ष कृतीतून समाजाची सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिकदृष्ट्या प्रगती साधण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असते. तसा संकल्प आपण करायला हवा. भाषणांनी समाजाची प्रगती होत नाही. त्यासाठी समाजाला विकासाची चळवळ राबवावी लागते. सर्वात आधी शिक्षणाकडे लक्ष द्यावे लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण हे वाघीणीचे दूध आहे, असे म्हटले आहे. परिस्थितीमुळे बरेचदा मुलांना चांगलं शिक्षण देणे पालकांना शक्य होत नाही. पण जिद्द ठेवली तर मार्ग निघू शकतो. कुणाला नर्सिंगचे, कुणाला ड्रायव्हिंग, हातमागाचे कौशल्य आत्मसात करायचे असेल तर त्यासाठी त्यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. शिक्षण हे रोजगाराभिमूख असायला हवे. जेणेकरून प्रशिक्षण घेतल्यानंतर मुले कुटुंबाचा आर्थिक आधार होऊ शकतील, असे गडकरी म्हणाले.

## नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातून भाजपकडून रमण सेनाड यांचा दावा

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन उमेदवारीसाठी पत्र सादर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या आगामी विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लोकजागृती मोर्चाचे अध्यक्ष ॲड. रमण सेनाड यांनी भारतीय जनता पक्षाकडून उमेदवारी मिळावी, यासाठी पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडे आपली भूमिका मांडली आहे. याच अनुषंगाने त्यांनी आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन उमेदवारी संदर्भात आपली मागणी मांडली.



तसेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचीही भेट घेऊन नागपूर विभाग पदवीधर मतदार संघातून भाजपची उमेदवारी मिळावी, यासाठी आपला दावा मांडणारे पत्र त्यांनी सादर केले. ॲड. रमण सेनाड हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शिशू गणापासून संघकार्याशी जोडलेले असून, ते मिसाबंदी परिवारातील सदस्य आहेत. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, विश्व हिंदू परिषद, भारतीय जनता पक्ष तसेच लोकजागृती मोर्चाच्या माध्यमातून त्यांनी विविध सामाजिक, राष्ट्रीय व नागरी प्रश्नांवर आंदोलने आणि जनजागृतीचे कार्य केले आहे. या आंदोलनांच्या माध्यमातून त्यांनी अनेकदा कारावासही भोगला आहे. रामजन्मभूमी आंदोलना दरम्यान अलाहाबाद येथील नैनी कारागृहात त्यांनी १५ दिवस कारावास भोगला होता, असे त्यांच्या प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे. उत्तम वक्ते आणि कुशल संघटक म्हणून परिचित असलेले ॲड. सेनाड हे व्यवसायाने अधिवक्ता आहेत. आपल्या व्यावसायिक कायासोबतच विविध सामाजिक संस्था व संघटनांच्या माध्यमातून गरीब, गरजू आणि वंचित घटकांसाठी ते कार्यरत आहेत. नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या सहा जिल्ह्यांचा समावेश आहे. आगामी विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या मतदारसंघासाठी भाजपमध्ये इच्छुकांच्या नावांची चर्चा सुरू असून, ॲड. रमण सेनाड यांनीही आपली उमेदवारी पक्षश्रेष्ठींकडे अधिकृतपणे मांडली आहे. भाजपकडून या मतदारसंघासाठी विविध इच्छुकांची नावे चर्चेत असताना, माजी आमदार सुधाकर कोहळे आणि माजी विधान परिषद सदस्य अनिल सोले यांचीही नावे चर्चेत असल्याचे वृत्त आहे. त्यामुळे पक्षाकडून अंतिम उमेदवाराची निवड कोणाची होते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. लोकजागृती मोर्चाच्या माध्यमातून ॲड. सेनाड यांनी यापूर्वी विविध सामाजिक, शैक्षणिक आणि नागरी प्रश्नांवर आंदोलने, निवेदने व जनजागृतीचे उपक्रम राबविले आहेत. दीर्घकाळ पक्षाच्या विचारधारे सोबत कार्यरत राहिलेल्या आणि संघटनात्मक व सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेल्या सेनाड यांच्या उमेदवारीच्या मागणीवर पक्षाचे वरिष्ठ नेतृत्व कोणता निर्णय घेते, याकडे नागपूर विभागातील भाजप कार्यकर्ते तसेच पदवीधर मतदारांचे लक्ष लागले आहे.

## कृष्णम नगरी युवा गणेशोत्सव मंडळाचा गणेशोत्सव उत्साहात

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** कृष्णम नगरी युवा गणेशोत्सव मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला गणेशोत्सव भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीपणे संपन्न झाला. गणरायाच्या आशीर्वादाने आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण उत्सवाला विशेष उत्साहाचे स्वरूप प्राप्त झाले. विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून गणेशोत्सव साजरा करण्यात आला. गणेशोत्सवाच्या या सोहळ्यात सहभागी झालेल्या नागरिक, भाविक, महिला, युवक तसेच लहान मुलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. नागरिकांनी दाखविलेला उत्साह, प्रेम आणि सहकार्य यामुळे मंडळाच्या कार्यकर्त्यांना मोठी प्रेरणा मिळाली. मंडळाच्या वतीने सर्वप्रथम विघ्नहर्त्या श्री गणरायाचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. बाप्पाच्या कृपेने आणि आशीवार्दाने संपूर्ण गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पडला.



गणेशोत्सवाच्या आयोजनामागे मंडळातील युवा कार्यकर्त्यांची मोठी मेहनत होती. कार्यक्रमाचे नियोजन, व्यवस्थापन, सजावट, भाविकांची व्यवस्था तसेच विविध उपक्रमांचे आयोजन यासाठी कार्यकर्त्यांनी रात्रंदिवस परिश्रम घेतले. या उत्सवाच्या यशामागे मंडळाच्या तरुण कार्यकर्त्यांची एकजूट आणि नियोजनबद्ध कार्यपद्धती महत्त्वाची ठरली. कोणत्याही अडचणीची पर्वा न करता कार्यकर्त्यांनी जबाबदाऱ्या सांभाळत उत्सव यशस्वी करण्यासाठी योगदान दिले. त्यांच्या या मेहनतीचे नागरिकांकडूनही कौतुक करण्यात आले. तसेच, गणेशोत्सवाच्या आयोजनासाठी आर्थिक, मानसिक तसेच प्रत्यक्ष स्वरूपात सहकार्य करणाऱ्या सर्व देणगीदार, हितचिंतक आणि नागरिकांचे मंडळाच्या वतीने विशेष आभार मानण्यात आले. त्यांच्या सहकार्यामुळे उत्सव अधिक भव्य आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करता आला. नागरिकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा मंडळाच्या कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## हेक्टरी एक लाख नुकसानभरपाईसह पीक विम्याची मागणी, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचा नरखेड तहसीलवर हल्लाबोल

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

कोरड्या दुष्काळामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, केवळ दुष्काळ जाहीर करून तकलादू उपाययोजना न करता प्रत्यक्ष आर्थिक मदत द्यावी, या मागणीसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने राज्यव्यापी हल्लाबोल आंदोलन पुकारण्यात आले आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सोमवार, २८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता नरखेड तहसील कार्यालयावर निवेदन देण्यात येणार आहे.



शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपयांची नुकसानभरपाई तातडीने त्यांच्या खात्यात जमा करावी, २०२४ व २०२५ सालचा प्रलंबित १०० टक्के पीक विमा त्वरित अदा करावा, तसेच नियमित कर्जदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान द्यावे, अशी प्रमुख मागणी संघटनेने केली आहे.

कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांचे CIBIL खराब होऊ नये, २०१९ पूर्वीपासून कर्जबाजारी असलेल्या सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या कक्षेत आणावे, तसेच पुनर्गठित व रूपांतरित कर्ज असलेल्या शेतकऱ्यांनाही कर्जमाफी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासोबतच शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज तातडीने उपलब्ध करून द्यावे, कर्ज देण्यास टाळाटाळ करणाऱ्या बँकांवर कारवाई करावी, शेतकऱ्यांना २४ तास वीजपुरवठा द्यावा आणि जळालेले रोहित्र तातडीने बदलावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. जुनी चार-ट्रिगर पीक विमा योजना लागू करावी, प्रलंबित कृषी सब्सिडी तातडीने अदा करावी, अशीही मागणी संघटनेने केली आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर गावागावात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, जनावरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध करणे, तसेच शेतमजूर व भूमिहीन कुटुंबांसाठी विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करण्याची मागणी आंदोलनातून करण्यात येणार आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी हल्लाबोल आंदोलन होत असताना नरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांनीही मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नागपूर जिल्हाध्यक्ष तथा शेतकरीपुत्र सागर दुधाने यांनी केले आहे.

**तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांची एकजूट**

दुष्काळ, प्रलंबित पीक विमा, कर्जाचा प्रश्न, वीजपुरवठा, पीक कर्ज आणि कृषी अनुदान या प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी नरखेड तहसील कार्यालयावर शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. शासनाने मागण्यांची तातडीने दखल घेऊन शेतकऱ्यांना प्रत्यक्ष आर्थिक मदत द्यावी, अशी भूमिका संघटनेने घेतली आहे.

## सभासदांचा विश्वास आणि सहकार्य हीच संस्थेच्या प्रगतीची खरी ताकद : दिलीप सुरकार

### विकास अर्बन संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कुकडे ले- आऊट येथील विकास अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच नामदेव महाराज सभागृह, कुकडे ले-आऊट येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. संस्थेचे अध्यक्ष दिलीप सुरकार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेला संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. सभेच्या प्रारंभी संस्थेच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला.



यावेळी अध्यक्ष दिलीप सुरकार यांनी आपल्या मनोगतातून संस्थेच्या प्रगतीचा आलेख सभासदां समोर मांडला. संस्थेने केलेली प्रगती, विविध उपक्रम तसेच सभासदांच्या हितासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांची माहिती त्यांनी दिली. यावेळी बोलताना दिलीप सुरकार यांनी, सभासदांचा संस्थेवर असलेला विश्वास हीच संस्थेच्या प्रगतीची खरी ताकद असून, सभासदांनी दिलेल्या सहकार्यामुळे संस्थेला सातत्याने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करता आली आहे, असे प्रतिपादन केले. संस्थेच्या विकासासाठी सभासद, पदाधिकारी आणि कर्मचारी यांच्यातील समन्वय महत्त्वाचा असल्याचेही त्यांनी नमूद केले. संस्थेच्या प्रगतीत योगदान देणाऱ्या सर्व सभासदांचे त्यांनी आभार मानत अभिनंदन केले. यानंतर संस्थेचे व्यवस्थापक तेजरावजी काळमेघ यांनी संस्थेच्या वार्षिक अहवालाचे वाचन केले.

संस्थेच्या वर्षभरातील कामकाजाची माहिती, विविध आर्थिक व प्रशासकीय बाबी तसेच संस्थेच्या पुढील वाटचालीसंदभार्तील माहिती सभासदां समोर सादर करण्यात आली. सभासदांनी यावेळी विविध विषयांवर चर्चा करून संस्थेच्या कामकाजा बाबत आपली मते व सूचना मांडल्या. सभेचे प्रभावी संचालन संस्थेच्या सह व्यवस्थापिका कु. वैशाली चव्हाण यांनी केले. उपस्थित सभासदांनी संस्थेच्या कार्यपद्धतीबाबत समाधान व्यक्त करत भविष्यातही संस्थेच्या प्रगतीसाठी सहकार्य करण्याचा विश्वास व्यक्त केला. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे गुणवंत विद्यार्थ्यांचा करण्यात आलेला सत्कार. संस्थेशी संबंधित सभासदांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याच्या संस्थेच्या या उपक्रमाचे उपस्थित सभासदांनी स्वागत केले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी ढगे, कांबळे, तिवारी, भागवत, लांबट, हाडगे, चौधरी, निनावे, सौ. खाडे, लोणारे यांच्यासह संस्थेचे कर्मचारी आणि मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. सभासदांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली.

थोडक्यात

## अस्थिका समाजात अखंड विष्णुसहस्रनाम पारायण उद्या

### विविध संस्था व भाविकांचा सहभाग, सकाळी गणपती पूजनाने प्रारंभ, महाआरतीनंतर महाप्रसादाचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विश्वा विष्णुसहस्रनाम संस्थान, चेन्नई, ग्रुप ऑफ श्री विष्णुसहस्रनाम सत्संग, VISVAS नागपूर सत्संग व VISVAS ग्लोबल टीम यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच अस्थिका समाज, नागपूर यांच्या सहकार्याने मंगळवार, २९ सप्टेंबर रोजी, अखंड विष्णुसहस्रनाम पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे. हे धार्मिक आयोजन श्री भगवती सभागृह, गजानन महाराज मंदिरा समोर, त्रिमूर्ती नगर, नागपूर येथे होणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता. गणपती पूजनाने होईल.



त्यानंतर विविध संस्था व सत्संग मंडळांच्या सहभागातून अखंडपणे श्री विष्णुसहस्रनामाचे सामूहिक पठण करण्यात येणार आहे. कार्यक्रमाची सांगता दुपारी १.३० वाजता मंगलारतीने होईल. त्यानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे. VISVAS चे संस्थापक अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ.टी.जे. श्रीधरन हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. नागपूर शहरातील विविध धार्मिक व सामाजिक संस्थांना या सामूहिक विष्णुसहस्रनाम पठणात सहभागी होण्यासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. तसेच भगवान महाविष्णूचे नामस्मरण करण्यासाठी शहरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

श्री विष्णुसहस्रनामाचे पठण हे कलियुगातील शांततेसाठी प्रभावी साधन आहे, अशी श्रद्धा आयोजकांनी व्यक्त केली आहे. श्री विष्णुसहस्रनामाचा संदेश जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्यासाठी VISVAS संस्था कार्यरत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून भक्ती, शिस्त, समर्पण, दृढनिश्चय, विकास आणि सातत्यपूर्ण प्रयत्न या मूल्यांचा संदेश देण्यात येणार आहे. भाविकांनी या आध्यात्मिक उपक्रमात सहभागी होऊन श्री महाविष्णूचे नामस्मरण व आशीर्वाद प्राप्त करावेत, असे आवाहन अस्थिका समाज, नागपूरचे सचिव के.व्ही.नागराजन यांनी केले आहे.

## वृक्ष लागवड ही मानवांच्या भविष्यातील मोठी गरज आहे : दिपक जोशी



**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

निसर्गाने मानवाला अनेक गोष्टी उत्पन्न करून दिलेल्या आहेत. त्यातील एक मूलभूत गरज म्हणजे वृक्ष होय. तो मानवाच्या किती उपयोगी आहे हे मानवाना अजूनपर्यंत कळलेले नाही. ते समजून घेणे आवश्यक आहे. असे उदगार नक्षत्रवन चे संस्थापक दिपक जोशी काका यांनी नुकतेच श्रीवर्धन म्हसळा येथे एका कार्यक्रमात काढले. यावेळी प्रकट महाराष्ट्र साप्ताहिक व यू - ट्यूब वृत्तवाहिनी च्या वतीने स्मृतीचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात करण्यात आला. दिपक जोशी काका यांनी ' नक्षत्रवन व श्रीस्वामीसमर्थ संस्कार केंद्राच्या माध्यमातून जनतेला उपयोगी असलेल्या प्रत्येकाच्या जन्म नक्षत्राच्या झाडांची लागवड करून त्यांचा उपयोग आपल्या दैनंदिन जीवनात कसा होतो ते समजावून सांगतात. त्यांनी वडघर - पांगलोली, म्हसळा, जिल्हा - रायगड. येथे विविध प्रकारची ३५०० झाडे लावलेली आहेत. त्यांच्या कर्तृत्वला पर्याय नाही. कारण " मंदिरातील घंटेला आवाज नाही, जोपर्यंत तुम्ही ती वाजवत नाही, कवितेला चाल नाही. जोपर्यंत तुम्ही ती गात नाही, झाडांचे महत्व कळणार नाही. जोपर्यंत त्यांची लागवड करून त्यांची जोपासना करणार नाही, तुमच्या भावनाना सुद्धा किंमत नाही. जोपर्यंत तुम्ही त्या व्यक्त करत नाही, कुणाचेही मन बिघडू नये अशी श्रद्धा हवी, निष्ठा ढळू नये अशी भक्ती हवी, सामर्थ संपू नये अशी शक्ती हवी आणि कधीही विसरू नये असे कर्म हवे. जे आपण नक्षत्रवन व श्रीस्वामी समर्थ संस्कार केंद्राच्या माध्यमातून समाजपुढे ठेवले आहे. कारण चंदनपेक्षा वंदन जास्त शीतल आहे, योगी होण्यापेक्षा उपयोगी होणे अधिक चांगले आहे." वरील प्रमाणे आपण आपल्या नक्षत्र वनात येणाऱ्या प्रत्येकाला मार्गदर्शन करून आपल्या जीवनात झाडाना किती महत्व आहे हे प्रात्यक्षिका सहित समजावून सांगता.

यशस्वी "आयुष्याच्या प्रवास करताना कांही गोष्टी सोडायच्या असतात, भूतकाळाचा पश्च'ताप आणि भविष्यकाळाची काळजी सोडली की वर्तमानातला सुंदर आनंद हा कस्तुरीपेक्षाही मौल्यवान असतो. याचा विचार करून प्रकट महाराष्ट्र गेली सात वर्ष अश्या व्यक्तींचा शोध घेऊन त्याच्या कार्याचा आढावा घेऊन त्यांची जगाला ओळख करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपण आजपर्यंत केलेल्या या जगावेगळ्या व्यासंगाची दखल प्रकट महाराष्ट्राने घेऊन आपला येथोचित सन्मान केलेला आहे. आमच्या नक्षत्र वनातील व श्रीस्वामीसमर्थ संस्कार केंद्रातील झाडे उच्च शिक्षित आहेत. कारण मी रोज दोन तास या सर्व झाडांची शाळा घेतो. त्यांना त्यांचे स्वतःचे महत्व पटवून देतो. त्यांची समाजात ओळख कशी आहे ते त्यांना सांगतो असेही जोशी काका यांनी आपल्या भाषणात सांगितले. या समारंभात पत्नी ज्योती जोशी, मुलगा - कौस्तुभ जोशी, विवेकस्नेही पत्रकार - मल्हारी घाडगे, रवी कोतापकर व दत्ताराम दळवी उपस्थित होते.

## कोदामेंढीत आज सायं. ६ वाजता ग्रामपंचायत कार्यालयऐवजी बसस्थानक चौकात विशेष ग्रामसभा

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

कोदामेंढीच्या इतिहासात प्रथमच उद्या सोमवार (ता. २८ सप्टेंबर)ला सायं. ६ वाजता ग्रामपंचायत कार्यालय ऐवजी बस स्थानक चौकात विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष ग्रामसभेत बस स्थानकावरील अतिक्रमणाबाबत चर्चा करणे, आठवडी बाजार सीमांकन करणे या विषयांवर विशेष चर्चा होणार असून, ग्रामस्थांनी या विशेष ग्रामसभेला उपस्थित राहण्याचे आव्हान सोशल मीडियाच्या ग्रुप वर तसे पत्र टाकून व गावात दवंडी देऊन केले आहे.

थोडक्यात

## विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशनचा ६३ वा स्थापना दिन उत्साहात साजरा

### उद्योग क्षेत्रातील योगदानाचा गौरव, मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विदर्भातील उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी कार्यरत असलेल्या विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशनचा ६३ वा स्थापना दिन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. उद्योग क्षेत्रातील मान्यवर, उद्योजक, व्यावसायिक तसेच असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात विदर्भाच्या औद्योगिक विकासातील विविध पैलूंवर चर्चा करण्यात आली. उद्योग क्षेत्राच्या वाढीसाठी उद्योजक, औद्योगिक संस्था आणि संबंधित घटकांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. बदलत्या औद्योगिक वातावरणात नव्या संधींचा लाभ घेत विदर्भात उद्योग व रोजगाराच्या संधी वाढविण्यावरही भर देण्यात आला. कार्यक्रमा दरम्यान उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

पुरस्कार स्वीकारताना संबंधितांच्या योगदानाचे उपस्थितांनी कौतुक केले. श्कअ च्या ६३ वर्षांच्या वाटचालीत विदभार्तील उद्योग क्षेत्राशी संबंधित विविध प्रश्नांवर संघटनेने भूमिका मांडत उद्योजकांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. भविष्यातही उद्योगांच्या विकासासाठी, उद्योजकांना मार्गदर्शन आणि औद्योगिक वातावरण अधिक सक्षम करण्यासाठी असोसिएशनच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित मान्यवरांनी विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशनच्या ६३ वर्षांच्या कार्याला शुभेच्छा देत आगामी काळातील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. सोहळ्यातील पुरस्कार वितरणाचा क्षण विशेष आकर्षण ठरला. नाग विदर्भ चेंबरचे अग्रवालजी आणि कोषाध्यक्ष सचिनजी पुणयानी यांची उपस्थिती होती.

## आदर्श शिक्षक पुरस्काराने वसंत पिसे यांचा गौरव, कान्होलीत अभिनंदनाचा वर्षाव



**दै. सिंहवाणी वृत्त, हिंगणा**

कान्होली, ता.हिंगणा जि.प.प्राथमिक शाळा, कान्होली (गुमगाव केंद्र) येथील मुख्याध्यापक वसंत रामचंद्र पिसे यांना उत्कृष्ट शैक्षणिक कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले सातत्यपूर्ण प्रयत्न आणि समर्पित सेवाभावाची दखल घेत आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. जिल्हा परिषद नागपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी साहेब यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सन्मानानंतर कान्होली गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांकडून पिसे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेची शैक्षणिक गुणवत्ता उंचावली असून विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणासह संस्कारमूल्येही रुजत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

याप्रसंगी उपसरपंच मिलिंद रमेश कोवे यांनी पिसे यांचा सत्कार केला आणि पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी ग्रामपंचायत सदस्या सुनीता वलके, दिपाली वलके, दिपाली करपते, मीना कोवे, आंचल कोवे, तसेच निता रंदई, अरविंद उईके, प्रदीप इटणकर, विकास करपते, नंदू कुमरे, भावेश वलके, मंगल कोवे,अरविंद कोवे, राज कळंबे, गौरव गोंडगे यांच्यासह गावातील विविध मान्यवर, पालक व नागरिक उपस्थित होते. उपस्थितांनी पिसे यांचे अभिनंदन करून हा सन्मान संपूर्ण कान्होली गावासाठी अभिमानाची बाब असल्याची भावना व्यक्त केली.

## 'विज्ञान जिज्ञासा २०२६'चे ६ ऑक्टोबरला आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विज्ञानाविषयीची जिज्ञासा वाढविण्याच्या उद्देशाने प्रो. राजेंद्र सिंग सायन्स एक्सप्लोरेटरीतर्फे प्रा. व्ही. जी. भिडे मेमोरियल इंटर स्कूल सायन्स क्विझ कॉम्पिटिशन - विज्ञान जिज्ञासा २०२६ या आंतरशालेय विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेर्चे आयोजन ६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३० ते दुपारी ३.३० या वेळेत करण्यात आले आहे. स्पर्धेत इयत्ता सहावी आणि सातवीतील विद्यार्थी सहभागी होऊ शकतील. प्रत्येक शाळेला दोन विद्यार्थ्यांची एक टीम पाठविता येणार असून, त्यामध्ये इयत्ता सहावीतील एक आणि सातवीतील एका विद्यार्थ्याचा समावेश असणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक कुतूहल निर्माण करण्याच्या उद्देशाने विज्ञान जिज्ञासा स्पर्धेची सुरुवात २०२४ मध्ये करण्यात आली. पहिल्या वर्षी भारती कृष्ण विद्या विहार स्कूलने विजेतेपद पटकावले, तर २०२५ मध्ये नारायणा विद्यालय, चिंचभवनने विजेतेपद मिळविले.

नागपूर व परिसरातील सर्व शाळांनी या स्पर्धेत सहभागी होऊन विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक जिज्ञासेला चालना द्यावी, असे आवाहन पीआरएसएसईतर्फे करण्यात आले आहे. स्पर्धेचे नियम, नोंदणी आणि अधिक माहितीसाठी पीआरएसएसई कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

# विद्यार्थ्यांनी कथ्थक, हिंदुस्थानी गायन, सितारवादनासह कार्यशाळांचा घेतला लाभ

### स्पिक मॅकेच्या तीन दिवसीय 'विरासत - हेरिटेज फेस्ट'चा समारोप







**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारतीय शास्त्रीय कला आणि सांस्कृतिक परंपरेची ओळख युवा पिढीला करून देण्याच्या उद्देशाने स्पिक मॅके, सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार आणि विश्वेश्वरया नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (व्हीएनआयटी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय 'विरासत - हेरिटेज फेस्ट'चा शनिवारी थाटात समारोप झाला. विद्यार्थ्यांनी ख्यातनाम कलाकारांचे कथ्थक नृत्य, हिंदुस्तानी शास्त्रीय गायन, सितारवादनासह त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

गुरुवारी झालेल्या विरासतच्या उद्घाटनप्रसंगी कथ्थक गुरु पंडित राजेंद्र गंगानी, डॉ. स्नेह गंगल, व्हीएनआयटीचे डीन डॉ. उमेश देशपांडे आणि संचालक प्रा. प्रेमलाल पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. उमेश देशपांडे यांनी स्पिक मॅकेच्या माध्यमातून भारतीय संस्कृती, परंपरा आणि कलांचे जतन करून त्या पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उपक्रमाचे कौतुक केले.

पंडित राजेंद्र गंगानी यांनी गणेश स्तुतीने केली. विविध ताल, मात्रा, उपज, उठान, तिहाई, तत्कार तसेच कवित्त, परमेलू आणि डमरू तिहाईच्या सादरीकरणातून त्यांनी कथ्थकच्या विविध पैलूंची ओळख करून दिली. त्यानंतर ठुमरी आणि द्रुत लयातील बंदिश सादर करत अखेरीस जुगलबंदीने कार्यक्रमाची सांगता केली. समीउल्लाह खान (हिंदुस्थानी शास्त्रीय गायक व संवादिनी वादक), मोहम्मद अयुब खान (सारंगी वादक), पंडित फतेह सिंग गंगानी (तबला वादक) आणि दीप्ती गुप्ता (कथ्थक नृत्यांगना व दीप्तीम डान्स अँड कल्चरल फाउंडेशनच्या संस्थापक) यांची संगीतसाथ लाभली.

दुसऱ्या दिवशी व्हीएनआयटीचे संचालक प्रा. प्रेम लाल पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत विदुषी कलापिनी कोमकली यांची हिंदुस्थानी शास्त्रीय गायनाची मैफल रंगली. त्यांनी मियाँ मल्हार रागातील बडा ख्याल बोल रे पपीहरा, मियाँ मल्हारमधील बंदिश, आजुनी रूसून आहे हे लोकप्रिय मराठी गाणे तसेच मीराबाईंचे एक भजन सादर केले. त्यांना श्रीकांत पिसे (हार्मोनियम) आणि संदेश पोपटकर (तबला) यांनी उत्तम साथसंगत केली.

समारोपाच्या दिवशी प्रमुख पाहुणे म्हणून व्हीएनआयटी उपसंचालक डॉ. बाबासाहेब संकपाल व रजिस्ट्रार एस. एस. जगदाळे उपस्थित होते. पंडित कुशल दास यांनी सांगीतिक मैफिलीची सुरुवात 'राग जयजयवंती'ने केली. आलाप, जोड आणि झाला अतिशय नजाकतीने पेश करत संपूर्ण वातावरणात सुरांची उधळण केली. त्यानंतर त्यांनी राग किरवानी व राग शिवरांजनी सादर करून त्यांच्या या जादुई सितार वादनाला रसिकांना भुरळ पडली. तबलावादक इमोन सरकार यांनी अत्यंत उत्कृष्ट साथसंगत केली.

सितार आणि तबल्याच्या या सुरेल जुगलबंदीने उपस्थितांची मने जिंकली. सुप्रसिद्ध सितारवादक पंडित कुशलदास यांच्या बहारदार सितार वादनाने रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना आणि सूत्रसंचालन ओम मानकामे यांनी केले, आभार प्रदर्शन डॉ. सारिका बहादुरे यांनी केले. तीन दिवसीय महोत्सवात कार्यशाळा, मास्टरक्लास आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना नामवंत कलाकारांकडून भारतीय शास्त्रीय कला आणि संस्कृतीचा अनुभव घेण्याची संधी मिळाली.

## आशियातील पायाभूत विकासावर ३ व ४ ऑक्टोबर रोजी आंतरराष्ट्रीय परिषद

### 'ASID २०२६' परिषदेचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी करणार उद्घाटन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आशियातील पायाभूत सुविधांच्या विकासाची दिशा, आधुनिक तंत्रज्ञान आणि शाश्वत विकासाच्या उपाययोजनांवर मंथन करण्यासाठी इंडियन काँक्रीट इन्स्टिट्यूट (आयसीआय), नागपूर केंद्राच्यावतीने एशियन सिनारिओ ऑन इन्फ्रास्ट्रक्चरल डेव्हलपमेंट या आंतरराष्ट्रीय परिषदेचे ३ व ४ ऑक्टोबर रोजी आयोजन करण्यात आले आहे.

रॅडिसन ब्लू हॉटेल, वर्धा रोड, नागपूर होत असलेल्या या परिषदेचे उद्घाटन ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

शहरीकरण, आर्थिक विकास, तंत्रज्ञानातील प्रगती आणि कार्यक्षम वाहतूक व नागरी सुविधांची वाढती गरज यामुळे पायाभूत क्षेत्रासमोर निर्माण होणाऱ्या संधी व आव्हानांवर परिषदेत चर्चा होणार आहे. पायाभूत सुविधांचे नियोजन, आराखडा, बांधकाम आणि प्रकल्पांची अंमलबजावणी यामध्ये शाश्वत, सक्षम, नाविन्यपूर्ण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

परिषदेत बुलेट ट्रेन, जगातील सर्वात लांब युएचपीएफआरसी पूल, उंच इमारती, मिसिंग लिंक, झोजिला बोगदा, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मेट्रो, नेट झिरो व कार्बन न्यूट्रल पायाभूत सुविधा, पायाभूत प्रकल्पांची टिकाऊपणा आवश्यकता तसेच शाश्वत पायाभूत विकाससमोरील जागतिक आव्हाने अशा विविध विषयांवर तज्ज्ञांकडून विचारमंथन केले जाणार आहे.

या परिषदेसाठी देश-विदेशातील नामवंत अभियंते, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ आणि पायाभूत क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी होणार आहेत. आयसीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. व्ही. रामचंद्र, महासचिव इंजि. राधाकृष्णन, आयसीआयचे माजी अध्यक्ष प्रा. महेश टंडन, सीबीआरआयचे संचालक डॉ. प्रदीप रामनचाराला, एनआयटी श्रीनगरचे संचालक प्रा. अनुराग मिश्रा, स्ट्रक्चरल इंजिनीयर्स वर्ल्ड कॉंग्रेस (इंडिया) चे अध्यक्ष डॉ. मनमोहन आर. कालगल, सनिकाचे संचालक इंजिनीयर निलोतपोल कार, आयआयटी मद्रासचे प्रा. मनु संथानम, सिडनीचे डॉ. स्टीफन फॉस्टर, टीएआयचे उपाध्यक्ष डॉ. लक्ष्मण राव यांच्यासह प्रा. के. व्ही. एल. सुब्रमणियम, इंजनि. फ्लोरियन क्रेन, डॉ. वू येन लेई, जोस कुरियन, सेंथीकुमार गणपती यांच्यासह विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांचे मार्गदर्शन परिषदेला लाभणार आहे.

ASID 2026 मध्ये सरकार, उद्योग, शिक्षण व संशोधन क्षेत्राला एकाच व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. पायाभूत प्रकल्पांमध्ये सहभागी सरकारी संस्था, सल्लागार, अभियंते, कंत्राटदार, तंत्रज्ञान कंपन्या, संशोधक आणि शैक्षणिक संस्थांमध्ये अनुभवांची देवाणघेवाण व सहकार्याच्या नव्या संधी निर्माण करण्यावर भर राहणार आहे.

परिषदेमध्ये आयोजित तांत्रिक प्रदर्शनात विविध संस्था व उद्योग क्षेत्रातील कंपन्यांकडून आधुनिक बांधकाम साहित्य, तंत्रज्ञान, उपकरणे, सेवा आणि नाविन्यपूर्ण उपाययोजनांचे स्टॉल्स राहतील. युवा अभियंते, संशोधक आणि अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनाही या परिषदेत सहभागी होऊन तज्ज्ञांशी संवाद साधण्याची आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती घेण्याची संधी मिळणार आहे. ASID 2026 मध्ये सादर होणारया दर्जेदार संशोधनपर लेखांपैकी निवडक लेख ASCE (American Society of Civil Engineers) च्या विशेष अंकातील जर्नलमध्ये प्रकाशनात केले जाणार आहेत. या परिषदेचे संयोजक इंजि. मनोज कावलकर, डॉ. एच. डी. चांदेवार व आयसीआय नागपूर सेंटरचे चेअरमन डॉ. स्वप्नील साटोणे हे आहेत.

## मनोहरराव नारायणराव गोसेवाडे यांचे निधन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर** : नागपूर येथील जुना कैलास नगर, अयोध्या नगर, शारदा चौक परिसरातील रहिवासी श्री. मनोहरराव नारायणराव गोसेवाडे यांचे रविवार, दि. २७ सप्टेंबर रोजी, सायंकाळी ७ वाजता . दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे ८६ वषार्चे वय होते. त्यांच्या निधनाने कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच परिचितांमध्ये शोककळा पसरली आहे. श्री. गोसेवाडे हे प्लॉट नं. ३५, जुना कैलास नगर, अयोध्या नगर, शारदा चौक, नागपूर येथे वास्तव्यास होते. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच आप्तेष्ट व परिचितांनी कुटुंबीयांप्रती शोकसंवेदना व्यक्त केल्या. त्यांच्यावर अंतिम संस्कार सोमवार, दि. २८ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता. मानेवाडा घाट, नागपूर येथे करण्यात येणार आहेत. अंत्ययात्रेत नातेवाईक, मित्रपरिवार व परिचितांनी उपस्थित राहून दिवंगत आत्म्यास श्रद्धांजली अर्पण करावी, असे कुटुंबीयांकडून कळविण्यात आले आहे.

## बोदलबोडीत गणरायाला भावपूर्ण निरोप

### बैलजोडीच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण उपक्रमाने वेधले लक्ष



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा**

बोदलबोडी गणेशोत्सवाच्या उत्साहपूर्ण वातावरणात बोदलबोडी येथे श्री गणरायाला भक्तिमय आणि भावपूर्ण वातावरणात अखेरचा निरोप देण्यात आला. गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीत पारंपरिक पद्धतीसोबतच बैलजोडीच्या माध्यमातून साकारण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या उपक्रमामुळे गणेश विसर्जनाला ग्रामीण संस्कृतीची अनोखी जोड मिळाली. गणेशोत्सव काळात विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. उत्सवाच्या सांगतेनिमित्त गणरायाची मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांचा गजर, गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात आणि भक्तिमय वातावरणात भाविकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. विशेष म्हणजे बैलजोडीच्या माध्यमातून गणरायाला निरोप देण्याचा उपक्रम यंदाच्या विसर्जन मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण ठरला. ग्रामीण भागातील पारंपरिक संस्कृती आणि गणेशभक्ती यांचा सुंदर संगम या उपक्रमातून पाहायला मिळाला. उपस्थित नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक केले. विसर्जन मिरवणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासनाकडून योग्य नियोजन करण्यात आले होते. ठाणेदारांनी गणेश मंडळाच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक करत उत्सव शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडल्याबद्दल आयोजक व कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले.

गणेशभक्तांनी 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' असा जयघोष करत आपल्या लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला. संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. या उपक्रमामुळे बोदलबोडी येथील गणेश विसर्जनाची सांगता यंदा विशेष चर्चेचा विषय ठरली. या उत्सव करिता सरपंच देवेंद्र पटले गणेश मंडळाचे अध्यक्ष चंद्रप्रकाश पटले सहसचिव गोविंदराव पटले तालुका पत्रकार संघटनेचे कोषाध्यक्ष यशवंतराव शेंडे सदस्यांमध्ये कमलेश पटले, हितेश कटरे, संपत भोयर, मनोहर नागपुरे, ओमप्रकाश येडे, सतीश पटले, राजेश गौतम, महेश हत्तीमारे, सचिन पटले यांच्यासह इतर मंडळाचे पदाधिकारी व ग्रामस्थांनी मोलाची कामगिरी बजावून भजन स्पर्धा कीर्तन रांगोळी स्पर्धा हंडी फोड विविध उपक्रमही राबवून एक

## सतार-तबल्याची जुगलबंदी व भुवनेश कोमकलीच्या गायकीने गाजला पहिला दिवस

### पं. गोपाळराव वाडेगांवकर स्मृती संगीत समारोहात स्वर-तालाची सुरेल मैफल



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दि ब्लाइंड रिलीफ असोसिएशन, नागपूर, पं. गोपाळराव वाडेगांवकर शिष्य परिवार आणि सप्तक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पं. गोपाळराव वाडेगांवकर स्मृती संगीत समारोहाचा पहिला दिवस सतार-तबल्याची जुगलबंदी व पं. भुवनेश कोमकलीच्या गायकीने गाजला. दि ब्लाइंड रिलीफ असोसिएशनच्या प्लॅटिनम ज्युबिली हॉलमध्ये शनिवारी सुरू झालेल्या या महोत्सवाचे उद्घाटन मॉरिस कॉलेजच्या संगीत विभागप्रमुख डॉ. साधना शिलेदार यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाला.

पहिल्या दिवसाच्या पहिल्या सत्राची सुरुवात तबला वादक विरथ वाडेगांवकर व संदेश पोपटकर तसेच, सतारवादक डॉ. उदय गुप्ते आणि डॉ. श्रीराम काणे यांच्या वादनाने झाली. राग यमनच्या मधुर स्वरांनी सतारीच्या सादरीकरणाला सुरुवात झाली. सुरेल आलापातून रागाची हळुवार उलगडणारी मांडणी करण्यात आली. त्यानंतर तबल्याच्या तालबद्ध साथीने सादरीकरणात रंगत आली. सतार आणि तबल्यातील स्वर-तालाचा संवाद, प्रश्नोत्तराच्या शैलीतील जुगलबंदी आणि वाढत्या लयीतील प्रभावी सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध झाले. सतारीच्या सुरेल ताना तसेच तबल्याच्या दमदार बोलांना रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली.

दुसऱ्या सत्रात गायक भुवनेश कोमकली यांनी राग जोगकंसने मैफिलीला सुरुवात केली. त्यानंतर 'सुघर बरपया नीके वनीके' यांसह विलंबित एकताल, छोटा खयाल अपीर पराइ, मध्यलय तिनतालातील शास्त्रीय रचनांचे सादरीकरण झाले. त्यांना श्रीकांत पिसे, आशय कुळकर्णी आणि निधी रानडे आणि वर्षिता बंसिवाल यांनी उत्तम साथसंगत केली.

पं. गोपाळराव वाडेगांवकर यांचे तबलावादनाबरोबरच गायन क्षेत्रातही मोठे योगदान होते. विशेषतः जयपूर घराण्याच्या संदभार्तील त्यांचे मार्गदर्शन आणि विविध विषयांवरील माहिती अत्यंत महत्त्वपूर्ण होती. आकाशवाणीच्या माध्यमातून तसेच आपल्या दोन मैफिलींमध्ये त्यांच्यासोबत वादन करण्याचा योग आला, ही आपल्यासाठी समाधानाची बाब असल्याचे मॉरिस कॉलेजच्या संगीत विभागप्रमुख डॉ. साधना शिलेदार यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन गजानन रानडे यांनी केले.

# महान क्रांतिकारक शहीद भगतसिंग

**रमेश लांजेवार**
**नागपूर**

पाकिस्तान मधील पंजाब प्रांतातील बांगा गावांमध्ये २८ सप्टेंबर १९०७ ला भगतसिंग नावाचा क्रांतिकारक तेजस्वी तारा जन्माला आला आणि भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात एक तेजोमय लखलखता प्रकाश निर्माण झाला व क्रांतीची मशाल संपूर्ण भारतात प्रज्वलित झाली आणि वयाच्या १४ व्या वर्षी स्वतंत्र लढ्यात उडी घेतली. भगतसिंग यांच्या आई-वडीलांनी भगतसिंग यांचे लग्न १९ व्या वर्षी करण्याचा विचार केला.परंतु त्यांनी लग्नास नकार दिला व घर सोडून निघून गेले आणि आपल्या आई-वडिलांकरीता एक पत्र लिहिले या पत्रात भगतसिंग लिहितात "मेरा जीवन एक महान उद्देश के लिये समर्पित है और वह उद्देश देश की आजादी है इसलीये मुझे तबतक चैन नही है.ना ही मेरी ऐसी कोई सांसारिक सुख की इच्छा है." यावरून स्पष्ट झाले की त्यांच्या नसानसात स्वातंत्र्याची ज्वाला धगधगत होती.

८ एप्रिल १९२९ ला भगतसिंग यांनी आपले क्रांतीकारी मित्र बटुकेश्वर दत्त यांच्या सोबत दिल्लीतील सेंट्रल असेम्ब्लीवर बॉब टाकला व इंग्रजांना जबरदस्त धक्का दिला यामुळे संपूर्ण भारतात स्वातंत्र लढ्याचा आगास झाला.आज शहिदांच्या पुंण्यायीनेच आणि आशिर्वादाने देशाची १४५ कोटी जनता खुला स्वास घेत आहे.अनेक क्रांतिकारक, थोर पुरुष यांच्या अथक परिश्रमाने, प्रयत्नाने व बलीदानाने १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. क्रांतिकारकांनी कोणत्याही गोष्टीची व आपल्या परिवाराची पर्वा न करता इंग्रजांना सडेतोड उत्तर देऊन स्वतंत्र भारताची मशाल १९४७ ला प्रज्वलीत केली.

१९२८ ला भारतातील घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडहून सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले. त्यावेळी सायमन कमिशन नावाचे वादळ रोखण्यासाठी लाला लजपतराय यांनी पुढाकार घेऊन "सायमन परत जा"च्या घोषणांनी संपूर्ण भारत एकवटला. हि बाब सायमन कमिशनचे अधिकारी सॅंडर्स यांना पचली नाही. लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने प्रदर्शनकारी जमा झाले. यामुळे सायमन कमिशनची घाबरगुंडी उडाली. त्यामुळे जमाव पांगवण्यासाठी सॅंडर्स यांनी लाठीचार्जचा आदेश दिला.यात लाला लजपतराय घायाळ झाले आणि त्यातच १७ डिसेंबर १९२८ ला त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या मृत्यूमुळे संपूर्ण भारत शोकाकुल झाला. हे दुःख भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना पहावले नाही. त्यामुळे क्रांतीकारकांच्या तळपायाची आग मस्तकात गेली आणि लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी क्रांतिकारकांनी कंबर कसली व लाला लजपतराय यांच्या मृत्यूला कारणीभूत असणारा अधिकारी सॅंडर्स याला ठार मारण्याचे ठरविले.लाला लजपतराय यांच्या पहिल्या मासिक श्राध्दाच्या दिवशी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव हे तिघेही वेष बदलुन सॅंडर्स यांच्या निवासस्थानी गेले. सॅंडर्स दिसताच सुखदेव यांनी संकेत दिले.

संकेत मिळताच भगतसिंग आणि राजगुरू यांनी एकाचवेळी गोळ्या झाडून सॅंडर्सला जागीच ठार केले व तेथुन पलायन केले.यामुळे इंग्रज आगबबुला झाले व इंग्रजांनी तिघांना पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. बरेच दिवस इंग्रजांना हुलकावणी देत तिन्ही क्रांतिकारक भूमिगत राहिले. परंतु फितुरीमुळे ते पकडले गेले. शेवटी २३ मार्च १९३१ ला भारतमातेच्या तिन्ही सुपुत्रांना इंग्रजांनी फाशी दिली.यामुळे संपूर्ण भारत स्तब्ध होऊन सर्वत्र शोककळा पसरली. भारत स्वतंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या या तिन्ही सुपुत्रांना कोन्हीही विसरणार नाही. "जो पर्यंत सुर्य-चंद्र, आकार-पाताळ आहे तोपर्यंत या शहिदांना कोण्हीही विसरणार नाही". भगतसिंग राजगुरू आणि सुखदेव यांचे बलीदान पाहून १४५ कोटी जनतेच्या तळपायाची आग आजही मस्तकात जाते.परंतु ९५ टक्के राजकीय पुढारी शहिदांना विसरल्याचे दिसून येते. कारण ९५ टक्के राजकीय पुढारी आज देशाच्या विकासापेक्षा व जनतेच्या सेवेपेक्षा स्वतःच्या विकासाकडे जास्त लक्ष देताना दिसतात. यामुळेच देशात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व अत्याचार उफाळलेला आहे. यामुळे महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, शिक्षणाच्या समस्या यामुळे आज



गरीबी व सर्वसामान्यांचे हाल-बेहाल होतांना दिसते. राजकीय पुढाऱ्यांनो याद राखा जोपर्यंत तुम्ही देशवासीयांच्या हितासाठी संपूर्ण ताकद लावणार नाही तोपर्यंत शहिदांच्या आत्म्याला शांती मिळणार नाही. क्रांतिकारक,शहिद हसत-हसत फासावर का चढले यामागचा त्यांचा एकच उद्देश होता.तो म्हणजे मातृभुमिची रक्षाकरून सर्वसामान्यांना न्याय मिळावा व भारत स्वतंत्र होवून सुख शांती निर्माण व्हावी.परंतु आजचा राजकीय पुढारी असा झाला आहे की "लोका सांगे ग्यान व स्वतः कोरडे पाषाण" यामुळेच या कृषी प्रधान देशात मुठभर ९५ टक्के राजकीय पुढारी वाममार्गाने पैसा कमवुन करोडपती झाल्याचे दिसून येतात व मनाने करोडपती असणारा अन्नदाता शेतकरी हवालदिल होत आहे.

भारतात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व गरीब हा गरीबीच्या खाईत जात आहे.या संपूर्ण बाबींची जान राजकीय पुढाऱ्यांनी ठेवली पाहिजे व देशसेवा आणि जनसेवा याकडे सर्वांनीच लक्ष केंद्रित केले पाहिजे तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांची शहीदांना खरी श्रद्धांजली मानल्या जाईल. राजकीय पुढाऱ्यांनी फक्त शहिदांचे अनुकरण करून लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी या पदाला कलंकित न करता यांचा योग्य आणि चांगला उपयोग करून जनसेवा केली पाहिजे. तेव्हाच शहिद-ए-आजम भगतसिंग यांना खरी श्रद्धांजली ठरेल व शहिदांच्या आत्म्याला शांती मिळेल.संपुर्ण देश शहिदांना आपली आदरांजली अर्पण करीत आहे. परंतु शहिदांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची जाण मुख्यत्वेकरुन राजकीय पुढाऱ्यांनी ठेवण्याची गरज आहे. कारण राजकीय पुढाऱ्यांचे लक्ष देशसेवेपेक्षा फक्त स्वतःचे हीत साधण्याचा प्रयत्न जास्त असतो. त्यामुळे सावधान! राजकीय पुढाऱ्यांनो कोणतेही कार्य करतांना शहिदांचे अनुकरण अवश्य करावे व त्यांच्या बलीदानाला कोठेही ठेच किंवा तडा पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी. हे भारत मातेच्या शहिद भुमि पुत्रांनो माझा कोटी-कोटी प्रणाम. बदलते हवामान व येणारा दुष्काळ यावर अंकुश लावण्यासाठी शहिद भगतसिंग यांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रत्येकांनी वृक्षलागवड केली पाहिजे. मुख्यत्वेकरून राजकीय पुढारी, सरकार, प्रशासन व सामाजिक संस्था यांनी भगतसिंग यांच्या जयंतीनिमित्त आठवण म्हणून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करावे. यामुळे संपूर्ण सृष्टी प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल, ऑक्सिजनची मात्रा वाढेल व प्रत्येक झाडांच्या पानांत,फुलात, फळात आपल्याला शहिद भगतसिंग सह संपुर्ण शहिदांचे अवश्य दर्शन होईल."जब तक सुरज चांद रहेंगा तबतक शहिदोंका नाम रहेंगा" शहिद भगतसिंग यांना जयंतीनिमित्त कोटी-कोटी प्रणाम.जय हिंद!

- ९९२१६९०७७९

# जीवन साधना, जीवनगौरव पुरस्कार संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

श्री मंगल बहुउद्देशीय शिक्षण, तांत्रिक शिक्षण व प्रशिक्षण संस्था रामनगर नागपूर द्वारा संचालित मूक बधिर निवासी शाळा सावनेर येथे संस्था व शाळा स्थापना दिनानिमित्त जीवन साधना पुरस्कार,जीवन गौरव पुरस्कार आणि दिव्यांग सन्मान पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या उत्साहात मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून मुकुंद सरमुकद्दम, शैला सरमुकद्दम व संस्थेचे अध्यक्ष प्रशांतराव डवले, सचिव नारायणराव समर्थ, सहसचिव डॉ. अमित चेडे,कोषाध्यक्ष निखिल समर्थ, प्रशासकीय अधिकारी मंगलाताई समर्थ, मुख्याध्यापिका सुवर्णा महाशब्दे, श्वेताताई समर्थ इत्यादी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाचा शुभारंभ



करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांचे शाळेच्या वतीने पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी समाजात आपल्या उल्लेखनीय कार्याने उद्योजक व सामाजिक क्षेत्रात ठसा उमटविल्याबद्दल द्वारकादास काटकोरिया व श्रीमती हर्षा काटकोरिया यांना जीवन साधना पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रात उल्लेखनीय सेवा दिल्याबद्दल अनुराधा विनय कुऱ्हेकर यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच दिव्यांग असतानाही प्रतिकूल परिस्थितीत जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर उच्च शिक्षण प्राप्त केल्याबद्दल डॉ. गोविंदराव समर्थ स्मृति प्रित्यर्थ अक्षय प्रकाश इंजेवार यांना दिव्यांग सन्मान पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. स्व. रुक्मिणीबाई गोविंदराव समर्थ स्मृति प्रित्यर्थ कु.खुशाली नंदलाल धानोरे हिला दिव्यांग सन्मान पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.प्रमुख पाहुणे मुकुंद सरमुकद्दम यांनी आपल्या भाषणात पुरस्कार्थींच्या कार्याचे व जिद्दीचे कौतुक केले.

जीवन गौरव पुरस्कार हा केवळ सन्मान नसून तरुण पिढीसाठी प्रेरणा असल्याचे त्यांनी सांगितले. सर्व पुरस्कार्थींना शाल,श्रीफळ,प्रमाणपत्र,स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. पुरस्कार देऊन सन्मानित केलेल्या मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना संस्थेच्या आणि शाळेच्या कार्याचे कौतुक करून हा पुरस्कार देऊन आम्हाला सन्मानित केल्याबद्दल संस्थेचे धन्यवाद व्यक्त केले तसेच फार मोठ्या प्रमाणात पुढील कार्याकरीता ऊर्जा मिळाल्याची भावना सर्वांनी व्यक्त केली.

द्वारकादास काटकोरिया व त्यांच्या परिवाराच्या वतीने संस्थेचे सचिव श्री नारायणराव समर्थ व प्रशासकीय अधिकारी मंगलाताई समर्थ यांना मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.त्यांच्या मानपत्राचे वाचन क्रीडा शिक्षक संजय लुंगे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव नारायण समर्थ यांनी केले तर मुख्याध्यापिका सुवर्णा महाशब्दे यांनी आभारप्रदर्शन केले.कार्यक्रमाचे संचालन क्रीडा शिक्षक संजय लुंगे यांनी केले व पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा परिचय शाळेच्या वाचातज्ज्ञ दुर्गा चेडे यांनी करून दिला.

कार्यक्रमाला पुरस्कार प्राप्त मान्यवरांच्या परिवारातील सदस्य,परिसरातील नागरिक, ज्येष्ठ नागरिक मंडळाचे सदस्य,विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. त्यानंतर सर्वांनी स्नेह भोजन घेतले. या पुरस्कार वितरण सोहळ्याला सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. आनंदमय वातावरणात पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. आयोजनाच्या यसशस्वीते करीता मूकबधिर निवासी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले

# चांप्यात 'सेवा संकल्प अभियान'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

## पारधी, आदिवासी, विमुक्त जाती-भटक्या जमाती बांधवांना एका छताखाली शासकीय योजनांचा लाभ, ९० प्रकरणे दाखल, आरोग्य शिबिरात १७० नागरिकांची तपासणी





**दै. सिंहवाणी वृत्त, चांपा**

मौजा चांपा येथील पारधी, आदिवासी तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या नागरिकांना विविध शासकीय योजना, प्रमाणपत्रे आणि मूलभूत सेवांचा लाभ स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्यासाठी रविवारी सेवा संकल्प अभियान विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत चांपा ग्रामपंचायत कार्यालयात हे अभियान राबविण्यात आले. या शिबिरात विविध विभागांशी संबंधित एकूण ९० प्रकरणे तहसील कार्यालय, उमरेड येथे दाखल करण्यात आली, तर आरोग्य शिबिरात १७० नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

नागपूर जिल्हाधिकारी आशीर्वाद कुमार तसेच आदिवासी विकास विभाग, नागपूरच्या अपर आयुक्त श्रीमती आयुषी सिंह (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात आले. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी उमेश काशीद, उमरेड उपविभागीय अधिकारी विद्यासागर चव्हाण, तहसीलदार प्रेमकुमार आडे, नायब तहसीलदार राजेश्वर राऊत, मनोज वाडे, मंडळ अधिकारी संदीप आवडेकर, तलाठी राजेंद्र नंदरधने, यामिनी रामटेके, पुरवठा विभागाचे संजय गांधी, निराधार योजनेचे आशिष चौधरी, सरपंच सोनाली अतिश पवार, ग्रामसेवक पवन उईके आणि माजी सरपंच अतिश पवार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. समशेर फाउंडेशन नागपूरचे अध्यक्ष अनिल पवार यांच्या टीमचीही उपस्थिती होती.

### एका छताखाली विविध शासकीय सेवा

या अभियानांतर्गत नागरिकांना विविध शासकीय विभागांच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या. यामध्ये घरांचे पट्टे, जाती प्रमाणपत्र, आधार कार्ड, घरकुल योजना, शेतजमिनीचे पट्टे, आयुष्मान भारत कार्ड, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, मोबाइल मेडिकल युनिट, घरगुती नळ जोडणी, पीएम किसान सन्मान निधी, किसान क्रेडिट कार्ड, वीज जोडणी, मनरेगा जॉब कार्ड, रेशन कार्ड, अधिवास प्रमाणपत्र, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, बीपीएल कार्ड तसेच वन अधिकार कायद्यांतर्गत दावे व वनपट्ट्यांशी संबंधित प्रकरणे यांचा समावेश होता.

### ९० प्रकरणे तहसील कार्यालयात दाखल

शिबिरात पुरवठा विभागाशी संबंधित ३४ प्रकरणे, उत्पन्न प्रमाणपत्रांची ४ प्रकरणे, वनपट्टा धारकांना शेती वनपट्टे वितरणासंदर्भातील ७ ई व १२ ईची ३ प्रकरणे, जाती प्रमाणपत्रांची २० प्रकरणे, अधिवास प्रमाणपत्रांची २० प्रकरणे, आधार नोंदणीची ३ प्रकरणे आणि आधारमधील नवीन दुरुस्तीची ६ प्रकरणे, अशी एकूण ९० प्रकरणे तहसील कार्यालय उमरेड येथे नोंदविण्यात आली.

यामुळे चांपा व परिसरातील नागरिकांना विविध शासकीय कार्यालयांमध्ये वारंवार फेऱ्या मारण्याऐवजी एकाच ठिकाणी आवश्यक कागदपत्रे व अर्ज प्रक्रियेबाबत सुविधा मिळाली.

### आरोग्य शिबिरात १७० नागरिकांची तपासणी

सेवा संकल्प अभियानच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य शिबिरात १७० नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. मोबाइल मेडिकल युनिटच्या माध्यमातून नागरिकांना प्राथमिक आरोग्यविषयक सेवा व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले.

### प्रशासन आणि समाज यांच्यातील समन्वय

या अभियानात महसूल, पुरवठा, वनविभाग, आदिवासी विकास विभाग, आरोग्य यंत्रणा आणि ग्रामपंचायत स्तरावरील यंत्रणांनी समन्वयाने सेवा उपलब्ध करून दिल्या. विशेषतः कागदपत्रांच्या अडचणींमुळे किंवा शासकीय कार्यालयांपर्यंत पोहोचण्यात येणाऱ्या अडचणींमुळे प्रलंबित राहिलेल्या प्रकरणांना स्थानिक पातळीवर पुढे नेण्याची संधी नागरिकांना मिळाली.

मौजा चांपा येथील विमुक्त जाती, भटक्या जमाती तसेच पारधी समाजातील लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ सहजपणे मिळवून देणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश आहे, अशी माहिती तहसीलदार प्रेमकुमार आडे यांनी दिली.

सेवा संकल्प अभियानच्या माध्यमातून चांपा येथे प्रशासन आणि स्थानिक नागरिक यांच्यातील समन्वयाला चालना मिळाली असून, शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्थानिक पातळीवर अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

# नागपुरात देशातील पहिले अतिविशेषोपचार दंतचिकित्सा व संशोधन केंद्र

## तीन महिन्यांत लोकार्पणाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कॅम्पसमधील प्रलंबित प्रकल्पांचा आढावा घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिविशेषोपचार दंतचिकित्सा व संशोधन केंद्राचे उर्वरित काम तातडीने पूर्ण करून पुढील तीन महिन्यांत त्याचे लोकार्पण करण्याचे निर्देश दिले आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि विविध अतिविशेष दंतचिकित्सा सुविधांनी सुसज्ज होणाऱ्या या केंद्रामुळे विदर्भासह मध्य भारतातील दंत रुग्णांना मोठा लाभ मिळणार असून, दंत शिक्षण व संशोधनालाही नवी दिशा मिळणार आहे.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या

अधिपत्याखालील शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर ही संस्था १९६८ पासून कार्यरत आहे. विदर्भ आणि मध्य भारतातून मोठ्या संख्येने दंत रुग्ण या संस्थेत उपचारासाठी येतात. दररोज किमान ५०० रुग्ण या संस्थेच्या आरोग्यसेवेचा लाभ घेतात. अशा महत्त्वपूर्ण संस्थेत अतिविशेषोपचार सेवा उपलब्ध करून देण्याच्या संकल्पनेतून या केंद्राची उभारणी करण्यात येत आहे.

### ४,७७० चौ. मीटर क्षेत्रफळात अत्याधुनिक केंद्र

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी सुमारे २२,००२ चौ. फूट जागेचे संपादन करण्यात आले असून, केंद्राचे एकूण बांधकाम क्षेत्रफळ सुमारे ४,७७०.१२ चौ. मीटर आहे. आधुनिक सुविधांनी सुसज्ज असणाऱ्या या प्रकल्पासाठी निधी मंजूर करण्यात आला असून, बांधकामाच्या गुणवत्तेसाठी आणि नियोजनासाठी तांत्रिक मान्यताही देण्यात आली आहे. प्रकल्पाचे भूमिपूजन ४ जानेवारी २०१९ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय परीवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले होते.

### ८० टक्के काम पूर्ण

या केंद्राच्या इमारतीचे ८० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. विद्युतविषयक कामांसाठी अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यासाठी १० ऑक्टोबर २०२४ रोजी प्रशासकीय मान्यताही प्राप्त झाली आहे. केंद्राच्या प्रभावी संचालनासाठी शासनाने नवीन पदांना मान्यता दिली असून काही पदांची भरती प्रक्रिया सुरू आहे. एकूण ९१ पदांपैकी ६० पदे भरली गेली आहेत.

### अत्याधुनिक यंत्रसामग्रीची उपलब्धता

केंद्रात अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा नियोजन समितीअंतर्गत सुमारे ३ कोटी ८९ लाख रुपयांच्या यंत्रसामग्री खरेदीस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. तसेच राज्य योजनेअंतर्गत सुमारे ३ कोटी ४३ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून यंत्रसामग्री खरेदीची प्रक्रिया सुरू आहे.

### सहा नवीन अतिविशेष दंतचिकित्सा विभाग

शासकीय दंत महाविद्यालय, नागपूर येथे अगोदरच ६३ पदवी पूर्व इऊ च्या जागा, २४ पदवी उत्तर एम डी एस च्या जागा आणि शिष्यवृत्ती व पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू असून नॅक ऐ प्लस श्रेणीकरण प्राप्त झालेली संस्था आहे. या नवीन केंद्राच्या माध्यमातून आता. दंतचिकित्सेतील आधुनिक आणि विशेष उपचार सुविधा एकाच छताखाली उपलब्ध होणार आहेत. यामध्ये डिजिटल डेंटिस्ट्री, कॉस्मेटिक डेंटिस्ट्री, ओरल इम्प्लांटोलॉजी, स्पोर्ट्स डेंटिस्ट्री, क्रॅनिओफेशियल सर्जरी आणि फॉरेन्सिक ओडोंटोलॉजी या सहा नवीन विभागांचा समावेश आहे.

### दंत रुग्णसेवा, शिक्षण आणि संशोधनाला चालना

अतिविशेषोपचार केंद्रामुळे जटिल दंतविकारांवर अत्याधुनिक उपचार उपलब्ध होण्याबरोबरच पदवीपूर्व आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना आधुनिक दंतचिकित्सा तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे रुग्णसेवा, दंत शिक्षण आणि संशोधन या तिन्ही क्षेत्रांना एकाच वेळी चालना मिळणार आहे.

### महाराष्ट्राच्या दंतचिकित्सा क्षेत्राला नवी ओळख

महाराष्ट्रात सध्या ४ शासकीय दंत महाविद्यालय, १ मुंबई महानगरपालिकेचे नायर दंत महाविद्यालय आणि ३० हून अधिक खासगी दंत महाविद्यालय असून, देशातील राज्य सरकारद्वारे चालविल्या जाणाऱ्या दंत महाविद्यालयांच्या बाबतीत महाराष्ट्र आघाडीवर आहे. नागपूर येथील अतिविशेषोपचार दंतचिकित्सा व संशोधन केंद्र अत्याधुनिक तंत्रज्ञानासह कार्यान्वित झाल्यानंतर दंत संशोधन आणि रुग्णसेवेच्या क्षेत्रात महाराष्ट्राची आघाडी आणखी मजबूत होण्यास मदत होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार उर्वरित कामांना गती देऊन हे केंद्र निर्धारित कालावधीत कार्यान्वित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे विदर्भातीलच नव्हे तर मध्य भारतातील रुग्णांसाठी अत्याधुनिक अतिविशेष दंतचिकित्सा उपचारांचे महत्त्वाचे केंद्र नागपुरात उपलब्ध होणार आहे.

थोडक्यात

## बाहुलीनाट्यातून गाणी गोष्टींचे मनोरंजक पद्धतीने सादरीकरण

### विद्यार्थ्यांसाठी आनंददायी शनिवारचा आगळावेगळा उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, पुणे**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताथवडे येथे आनंददायी शनिवार अंतर्गत नयना बागुल यांनी बाहुली नाट्याच्या माध्यमातून मनोरंजक पद्धतीने गाणी गोष्टी यांचे सादरीकरण केले. तसेच



बाहुली नाट्याच्या कार्यक्रमातून समाज प्रबोधन केले. या कार्यक्रमाला शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मुळशी तालुक्यात उपक्रमशील शाळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताथवडे येथे विद्यार्थ्यांसाठी आनंददायी शनिवार हा उपक्रम राबविण्यात येतो. विद्यार्थ्यांना मनोरंजक पद्धतीने गाणी गोष्टी ऐकायला मिळाव्या व त्याचा अनुभव घेता यावा यासाठी नयना बागुल यांना आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी बागुल यांनी बाहुली नाट्याचे सादरीकरण करत माकड आणि मगर यांची मैत्री ही कथा सादर केली. तसेच शेपटीवाल्या प्राण्यांची भरली होती सभा हे गीत सादर करत विद्यार्थ्यांचा त्यात सहभाग घेतला. बागुल यांचा ४६ वा प्रयोग असून गेली दहा वर्षापासून त्या शिक्षण क्षेत्रात ज्ञानदानाचे काम मोफत करतात. या कार्यक्रमाला सर्व शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी उदंड प्रतिसाद दिला.

यावेळी मुख्याध्यापक संगिता सूर्यवंशी, कविता मोहिते, भारती जाधव, जयश्री दांगडे, सारिका भालेकर, शिवप्रसाद गुट्टे, प्रिती चव्हाण आणि साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर उपस्थित होते. मारुंजी केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश साबळे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे. गटशिक्षणाधिकारी संग्राम पाटील आणि गटविकास अधिकारी सुधीर भागवत यांनी शिक्षकांचे अभिनंदन करत शाळेला शुभेच्छा दिल्या आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर यांनी केले. तर मुख्याध्यापक संगिता सूर्यवंशी यांनी आभार मानले.

## सेवा संकल्प अभियानातून न.पं. चा स्वच्छ भिवापूरचा संकल्प



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

सेवा संकल्प अभियानांतर्गत येथील नगरपंचायतीच्या वतीने सामुदायिक कचरा संकलन मोहीम राबविण्यात आली. यावेळी प्लास्टिक तसेच सुका कचरा संकलित करून एकात्मिक घनकचरा व्यवस्थापनाचा संदेश देण्यात आला. नगराध्यक्ष कु. सुषमा श्रीरामे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या मोहिमेत राष्ट्रीय विद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक, नगरसेवक, पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. कचरा कमी करणे, त्याचे योग्य व्यवस्थापन करणे आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

या उपक्रमास सभापती रीना खापरीकर, जया नंदनवार, वैशाली पेंदाम, कांचन बालापांडे, रमेश भजभुजे यांच्यासह नगरपंचायतीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. स्वच्छता ही केवळ मोहीम नसून प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचा संदेश या अभियानातून देण्यात आला.

## जिल्हास्तरीय जलतरण क्रीडा स्पर्धेत सूर्यांशु बारसे प्रथम

### विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी सूर्यांशु याची निवड

**दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर**

भंडारा जिल्हा क्रीडा संकुल येथे क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत , जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्याकडून जिल्हास्तरीय जलतरण क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. भंडारा जिल्हास्तरीय जलतरण क्रीडा स्पर्धा सन २०२६-२७ मध्ये १४,१७व १९ वर्षाच्या वयोगटातील मुला मुलींनी भाग घेतले होते.



जलतरण क्रीडा स्पर्धेत सूयार्शु सुभाष बारसे महर्षी विद्या मंदिर फुल मोगरा शाळेचा विद्यार्थी याने ब्रेस्ट स्ट्रोक प्रकारात ५० मीटर, १०० मीटर व २०० मीटर स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावले असून सूर्यांशु बारसे याची निवड विभागीय स्पर्धा करीता झाली आहे. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडिल व गुरुजनांना दिले आहे.

## १ ऑक्टोबरपासून एसी, टीव्ही आणि वॉशिंग मशीनचे दर वाढणार

**नवी दिल्ली :** यंदा ऑक्टोबर महिन्यात दसरा तर नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला दिवाळीचा सण आहे. या दोन्ही सणांच्या वेळी भारतीय ग्राहक मोठ्या प्रमाणात एसी, टीव्ही, इतर घरगुती इलेक्ट्रिक उपकरणांची खरेदी करतात. मात्र, यंदा या सणांच्या अगोदरच ग्राहकांना महागाईचा फटका बसणार आहे कारण १ ऑक्टोबरपासून एसी, टीव्ही यासह इतर इलेक्ट्रिक उपकरणांच्या दरात वाढ होऊ शकते. इलेक्ट्रॉनिक्स कंपन्यांकडून विविध कारणांमुळं दरवाढ करण्याची तयारी करण्यात येत आहे. धातूंचे वाढलेले दर, डॉलरच्या तुलनेत रुपयांची घसरण, आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थिती यामुळं भारतीय ग्राहकांवर महागाईचं संकट ओढावणार आहे. इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांकडून १ ऑक्टोबर २०२६ पासून दरवाढ करण्याचा निर्णय घेतला गेला आहे. पीटीआयच्या रिपोर्टनुसार इलेक्ट्रॉनिक्स कंपन्यांकडून १ ऑक्टोबरपासून करण्यात येणारी दरवाढ ही या वषार्तील तिसरी दरवाढ असेल.

# निसर्गचित्रांच्या अभ्यासपूर्ण रसग्रहणात न्हाले चित्ररसिक

### विदर्भ साहित्य संघ आणि सर्जना निर्माणतर्फे निसर्गचित्रांवरील व्याख्यानमालेला उदंड प्रतिसाद







**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

निसर्गचित्रांच्या अभ्यासपूर्ण रसग्रहणात चित्ररसिक न्हाऊन निघाल्याचा अनुभव आज मोठ्या संख्येने उपस्थित रसिकांनी घेतला. विदर्भ साहित्य संघ आणि सर्जना निर्माण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चित्र-शिल्प रसग्रहण व्याख्यानमालेचा ३० वा कार्यक्रम आज शासकीय चित्रकला व अभिकल्प महाविद्यालय, लक्ष्मीनगर येथे संपन्न झाला. 'निसर्ग बिलोरी ऐना' या शीर्षकाखाली झालेल्या या व्याख्यानमालेत विविध निसर्गचित्रांवर अभ्यासपूर्ण भाष्य करण्यात आले.

सुरुवातीला 'नाशिक दरवाजा आणि पाच चित्रकार' या विषयाची सविस्तर मांडणी चित्रकार डॉ. विश्वनाथ साबळे यांनी केली. एम. के. परांदेकर, एस. एल. हळदणकर, व्ही. जी. कुळकर्णी, एम. एस. जोशी आणि एस. एच. रझा या पाच चित्रकारांनी नाशिकमधील 'नाशिक दरवाजा' हे चित्र वेगवेगळ्या काळात रेखाटले आहे. यामागील संदर्भ स्पष्ट करताना डॉ. साबळे यांनी सांगितले की, नाशिकचे नैसर्गिक सौंदर्य चित्रकारांना नेहमीच आकर्षित करत आले आहे. या चित्रात गोदावरी नदीकडे जाणारा रस्ता असून, पुढे नदी पार करण्याची सुविधा होती. त्यामुळे नदीकडे उघडणारे प्रवेशद्वार म्हणून या रस्त्याला 'नाशिक दरवाजा' असे संबोधले गेले असावे. या पाचही चित्रकारांनी गुरु-शिष्य परंपरेनुसार या विषयाकडे पाहत त्यातील बारकावे आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. चित्रांमध्ये ब्रिटिशकालीन पारदर्शक रंगांचा वापर दिसून येतो, तसेच पांढऱ्या रंगाचा विशेष वापर आढळत नाही. या पाचही चित्रकारांनी वेगवेगळ्या कालखंडात हे चित्र रेखाटल्यामुळे काळानुसार नाशिकच्या परिसरात आणि चित्रशैलीत झालेले बदलही त्यांच्या चित्रांमधून स्पष्टपणे दिसून येतात, असे डॉ. साबळे यांनी सांगितले.

त्यानंतर ज्येष्ठ नाटककार डॉ. पराग घोंगे यांनी 'नंदलाल बोस आणि शांतिनिकेतन परिसर' या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. 'शांतिनिकेतन परिसर' या चित्राचे विवेचन करताना त्यांनी या चित्रात स्थानिक संवेदनशीलता आणि परिसराशी असलेले नाते प्रकर्षाने जाणवत असल्याचे सांगितले. चित्रातील रेषांचा वापर केवळ तपशील दाखवण्यासाठी नसून दिशा सूचित करण्यासाठी करण्यात आला आहे. त्यामुळे प्रत्येक चित्रात एक प्रकारची गतिमानता आणि हालचालीची अनुभूती निर्माण होते. स्थानिक भूगोलाचे सौंदर्य आणि निसर्गाशी असलेले नातेही या चित्रातून प्रभावीपणे व्यक्त होते. नंदलाल बोस यांच्या चित्रशैलीत आधुनिकतावादाचे दर्शन घडते. त्यांची चित्रे अमूर्त, व्यक्तिनिष्ठ आणि तत्त्वज्ञानाधारित असून, त्यामध्ये तत्कालीन राजकीय व सामाजिक परिस्थितीचेही प्रतिबिंब दिसून येते. 'यम आणि सावित्री' या चित्राचे विवेचन करताना हे चित्र यम आणि सावित्री यांच्या प्रारंभीच्या संवादाचा क्षण दर्शवत असावे, असे डॉ. घोंगे यांनी सांगितले. चित्रातील बारकाव्यांमधून समंजस आधुनिकतावाद, तसेच सुबोध आणि भूमितीय घटकांचा कौशल्यपूर्ण वापर दिसून येतो. भारतीय संविधानातील रामायणाशी संबंधित चित्रे तसेच महात्मा गांधी यांचे चित्र यांची उदाहरणे देत त्यांनी नंदलाल बोस यांच्या चित्रशैलीतील वैशिष्ट्ये स्पष्ट केली.

शेवटी 'एडवर्ड मोने आणि वॉटर लिलीज' या विषयावर ज्येष्ठ चित्रकार आणि कलासमीक्षक प्रा. चंद्रकांत चन्ने यांनी आपले मनोगत व्यक्त केले. चित्रकलेच्या इतिहासातील 'संडे पेंटर' या संकल्पनेचा संदर्भ देत त्यांनी रंगांच्या मुक्त आणि गतिमान वापराबद्दल विवेचन केले. मोने यांच्या चित्रशैलीत रंगांची स्वतंत्र चळवळ जाणवते. त्यांच्या चित्रांमध्ये काळा आणि पांढरा या रंगांना पारंपरिक अर्थाने विशेष स्थान नसल्याचे त्यांनी नमूद केले. इंप्रेशनिझम ही केवळ चित्रशैली नसून एक स्वतंत्र कलाचळवळ म्हणून उदयास आली आणि 'वॉटर लिलीज' या चित्रमालिकेतून तिच्या वैशिष्ट्यपूर्ण प्रवासाची सुरुवात झाल्याचे प्रा. चन्ने यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन ज्येष्ठ साहित्यिक प्रकाश एदलबादकर यांनी केले. या कार्यक्रमाला नागरिक, कला शाखेचे विद्यार्थी आणि चित्ररसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोनेगाव (लोधी) च्या उड्डाणपुलास ग्रामस्थांचा विरोध

### ग्रामपंचायत व ग्रामस्थांचे निवेदन



**दै. सिंहवाणी वृत्त, बेला**

जवळच्या सोनेगाव (लोधी) येथून गेलेल्या राष्ट्रीय महामार्गावर उड्डाण पूल बांधण्यास ग्रामस्थांनी आक्षेप घेतला असून त्यांचे तक्रारीवरून गट ग्रामपंचायतने ठराव पारित करून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे पाठवला आहे.

सोनेगाव (लोधी) येथून नागपूर हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.४४ गेला आहे.वाढती वर्दळ वाहतूक लक्षात घेता लवकरच हा मार्ग सहा पदरीकरण करण्यात येणार आहे. येथूनच बेला, सिर्सी चा रस्ता जोडला गेला आहे. जवळपासच्या अनेक खेड्यांची बाजारपेठ बेला आहे. याशिवाय, बेला नजीक खुरसापर जवळ केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या आयडियल एनर्जी प्रोजेक्ट व मानस अँग्रो अँड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी येथे आहे. तिथे इंडियल प्रोजेक्ट तसेच मांनस अँग्रो इन्फ्रास्ट्रक्चर चे मालवाहक ट्रक तसेच असंख्य अवजड वाहने व इतरही, बस, ट्रक आदी वाहनांची सोनेगावच्या टी पॉइंटवरून आवक जावक सुरू असते. महामार्गाच्या कंकणाकृती वळणावरच टी पॉईंट असल्याने हे अपघाती ठिकाण झाले अशी चर्चा आहे.त्यामुळे दळणवळण सुलभ होण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण येथे ओव्हर ब्रिज बांधणार असल्याची चर्चा ग्रामस्थांना कळली

मागील वर्षापासून सोनेगाव लोधी येथे बुधवारला आठवडी बाजार भरतो.तसेच, महामार्गावर गावालगत पेट्रोल पंप, अनेक हॉटेल,बार,रेस्टॉरंट असल्यामुळे चहा कॅन्टीन, पान टपऱ्या व इतरही धंदे येथे बऱ्यापैकी चालतात. प्रस्तावित ओव्हर ब्रिजमुळे उपजीविका धोक्यात येण्याची व्यापाऱ्यांना भीती वाटत आहे. त्यातून गावातील अंदाजे चारशे नागरिक व व्यापाऱ्यांनी सोनेगाव लोधीचे गट ग्रामपंचायत कार्यालयात आक्षेपाचा तक्रार अर्ज दिला. प्राप्त तक्रारीवरून २४ सप्टेंबरला सरपंच नीलिमा ढगे व सचिव पंकज चाफले यांनी ठराव पारित करून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रादेशिक कार्यालयात कार्यकारी अभियंता यांचेकडे पाठवला आहे.

ठराव वठराव व निवेदनाच्या प्रती प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री बावनकुळे, आमदार समीर मेघे व इतर संबंधितांना पाठवल्या आहेत.

> सोनेगाव (लोधी) चे हद्दीतून गेलेल्या राष्ट्रीय महामार्गावर ओव्हर ब्रिज बांधण्या संदर्भात ग्रामपंचायतला पत्र आले नाही. अथवा, महामार्ग प्राधिकरणाने ग्रामपंचायतची परवानगी सुद्धा मागितली नाही. नागरिक व व्यापाऱ्यांचा विरोध असल्याने येथे उड्डाणपूल बांधण्यात येऊ नये.
>
> **- निलिमा अमोल ढगे**
> **सरपंच, ग्रामपंचायत सोनेगाव (लोधी)**

## मनपातर्फे जागतिक रेबीज दिनानिमित्त जनजागृती अभियान आज

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** नागपूर महानगरपालिका आरोग्य विभागातर्फे २८ सप्टेंबर जागतिक रेबीज दिन निमित्त शहरातील नागरिकांमध्ये रेबीज आजाराबाबत जनजागृती करण्यासाठी विविध जनजागृती व उपक्रम राबविण्यात येणार आहेत. रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरण व आवश्यक वैद्यकीय उपचारांसाठी संबंधित केंद्रांवर सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत नागरिकांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

रेबीज हा कुत्रा, मांजर तसेच इतर संक्रमित प्राण्यांच्या चाव्यामुळे होणारा गंभीर आजार असून, लक्षणे सुरू झाल्यानंतर तो जीवघेणा ठरू शकतो. मात्र, प्राण्याने चावा घेतल्यानंतर जखम तात्काळ स्वच्छ धुणे, वैद्यकीय सल्ल्यानुसार रेबीज प्रतिबंधक लस घेणे आणि आवश्यक असल्यास रेबीज इम्युनोग्लोब्युलिन घेणे यामुळे रेबीजपासून बचाव करता येतो. नागपूर महानगरपालिका अंतर्गत विविध नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व शासकीय रुग्णालयांमध्ये रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी कुत्रा चावल्यानंतर वैद्यकीय सल्ल्यानुसार वेळेत लसीकरण करून घ्यावे.

## शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असलेले महायुती सरकार : राधा मुकेश अग्रवाल

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

नागपूर जिल्ह्यासह राज्यातील २६५ तालुक्यांत कोरडा दुष्काळ जाहीर करून यंदाच्या खरिपाच्या हंगामात पावसाच्या खंडामुळे आणि अपुऱ्या पावसामुळे अडचणीत आलेल्या बळीराजाला मोठा दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने २५ सप्टेंबर २०२६ रोजी अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचा शासन निर्णय घेतला आहे.या निर्णयामुळे शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभे असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे, असे मत खात - रेवराल जिल्हा परिषद सर्कलच्या माजी जिल्हा परिषद सदस्या राधा मुकेश अग्रवाल व माजी भाजपा मौदा मंडळ अध्यक्ष मुकेश अग्रवाल यांनी व्यक्त केले.





या सर्वसमावेशक निर्णयाबद्दल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे मनापासून आभार म्हणून अग्रवाल दांपत्य पुढे म्हणाले की, काही वृत्तपत्रांमध्ये विरोधकांकडून केवळ प्रसिद्धीसाठी व राजकारणासाठी सरकारवर टीका केली जात आहे. परंतु, विरोधक फक्त कागदी आरोप करत असताना, आमच्या सरकारने मात्र कुठलाही वेळ न घालवता थेट प्रत्यक्ष पावले उचलली आहेत. शासनाने केवळ घोषणा न करता प्रत्यक्षात सवलती व उपाययोजना ताबडतोब लागू केल्या आहेत. शेतकऱ्यांच्या प्रत्येक समस्येवर संवेदनशीलता दाखवत विरोधकांच्या निराधार टीकेला आमच्या सरकारने कर्तृत्वाने आणि धोरणात्मक निर्णयांनी चोख प्रत्युत्तर दिले आहे. बळीराजाचे हित हेच आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे.

## केंद्रीय वाचनालयाची ६० वर्षांची ज्ञानसेवा

### संस्थापक डॉ. रमेश जनबंधूंचा अमृत महोत्सवी सत्कार, २८ नोव्हेंबरला नागरी सोहळा

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

धर्मापूर पेठेतील केंद्रीय वाचनालयाने ज्ञानप्रसाराची ६० वर्षांची वाटचाल पूर्ण केली आहे. वाचनालयाचे संस्थापक आणि राज्यस्तरीय ग्रंथमित्र पुरस्काराचे मानकरी डॉ. रमेश जनबंधू यांनीही वयाची ७५ वर्षे पूर्ण केल्याने त्यांच्या अमृत महोत्सवी नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त २८ नोव्हेंबरला वाचनालयाच्या परिसरात भव्य नागरी सोहळा होणार असून, डॉ. जनबंधू यांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या गौरवग्रंथाचे प्रकाशनही करण्यात येणार आहे. या सोहळ्याच्या नियोजनासाठी शनिवारी (२६ सप्टेंबर) केंद्रीय वाचनालयाच्या प्रांगणात भिवापूर शहर नागरी सत्कार समितीची बैठक झाली. बैठकीत २८ नोव्हेंबरला एकदिवसीय कार्यक्रम घेण्याचे निश्चित करण्यात आले.

केंद्रीय वाचनालय हे भिवापूर तालुक्यातील विद्यार्थी, अभ्यासक आणि वाचकांसाठी महत्त्वाचे ज्ञानकेंद्र म्हणून कार्यरत आहे. स्पर्धा परीक्षांची पुस्तके, संदर्भग्रंथ, मराठी साहित्य, कादंबऱ्या तसेच विविध शैक्षणिक साहित्याचा संग्रह येथे उपलब्ध आहे. वाचनकक्ष, दैनिके आणि मासिकांच्या सुविधेमुळे गेल्या सहा दशकांत वाचनसंस्कृती रुजविण्यात वाचनालयाने योगदान दिले आहे.

बैठकीत माजी नगराध्यक्ष लव जनबंधू यांनी प्रस्तावित सोहळ्याची रूपरेषा मांडली. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य तथा शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दिलीप गुप्ता, नगरपंचायत उपाध्यक्ष रुचित पंजलवार, पत्रकार जोगेंद्र सरदारे, नगरसेवक किरण नागरीकर, धनश्री गजभिये, विजय लांजेवार, कुंदाताई कंगाले, वसंतराव ढोणे, सचिन काळे, विश्वनाथ जांभूळकर, प्रेमदास सोरदे आदी उपस्थित होते. डॉ. जनबंधू यांच्या कायार्चा गौरव आणि केंद्रीय वाचनालयाच्या सहा दशकांच्या ज्ञानसेवेचा सन्मान करणाऱ्या या सोहळ्याकडे नागरिक, विद्यार्थी आणि वाचकांचे लक्ष लागले आहे.

## ३७४० ढोल-ताशा वादकांसह ८०० कलाकारांनी सादर केल्या विविध कला

### सांस्कृतिक गणेशोत्सवात ५५० मंडळांचा सहभाग






**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

गणेशोत्सवाच्या माध्यमातून कला, संस्कृती आणि परंपरांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने आयोजित सांस्कृतिक गणेशोत्सवाला यंदा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शहरातील तब्बल ५५० गणेश मंडळांनी या उपक्रमात सहभाग घेतला. त्यात ५४ ढोल-ताशा पथकांमधील तब्बल ३७४० वादकांनी पारंपरिक वादन सादर करत गणेशोत्सवाचा उत्साह द्विगुणित केला. याशिवाय सुमारे ८०० कलाकारांनी विविध कला सादर करून नागपूरकरांचे मनोरंजन केले.

गणेश मंडळांच्या मागणीला प्रतिसाद देत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकारातून यंदा ढोल-ताशा पथकांसाठी विशेष नोंदणी प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्याला पथकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पारंपरिक ढोल-ताशा वादनामुळे गणेशोत्सवाच्या मिरवणुका आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळावे, कला-साहित्य-संस्कृती आणि परंपरांचे जतन व संवर्धन व्हावे, तसेच गणेश मंडळांनी केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमही राबवावेत, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

यंदाच्या महोत्सवात भक्तिसंगीत, सुगम संगीत, देशभक्तिपर गीते, हास्य कविसंमेलन, जागरण, गोंधळ, कीर्तन, लोकनृत्य, शास्त्रीय नृत्य, एकपात्री प्रयोग, नाट्यप्रयोग, नकला, गीत रामायण, जादूचे प्रयोग, रांगोळी व मेंदी प्रशिक्षण वर्ग, कथाकथन आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या माध्यमातून ८०० कलाकारांनी आपली कला सादर केली.

खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने स्थानिक गणेश मंडळे, ढोल-ताशा पथके, वादक आणि कलाकार यांना यानिमित्ताने व्यासपीठ उपलब्ध करून दिले. त्यामुळे यंदाचा सांस्कृतिक गणेशोत्सव हा नागपूरच्या सांस्कृतिक वैविध्याचे दर्शन घडविणारा ठरला.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी खासदार सांस्कृतिक महोत्सव आयोजन समिती, नागपूरचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, उपाध्यक्ष डॉ. गौरीशंकर पाराशर, डॉ. दीपक खिरवडकर, अशोक मानकर, दिलीप जाधव, सचिव जयप्रकाश गुप्ता, कोषाध्यक्ष प्रा. राजेश बागडी, सदस्य बाळासाहेब कुलकर्णी, हाजी अब्दुल कदीर, सारंग गडकरी, अविनाश घुशे, संदीप गवई, संजय गुळकरी, रेणुका देशकर, गुड्डू त्रिवेदी, किशोर पाटील, चेतन कायरकर, आशिष वांदिले, भोलानाथ सहारे, ॲड. नितीन तेलगोटे, मनिषा काशीकर, विजय फडणवीस, महेंद्र राऊत, दिलीप गौर, शैलेश ढोबळे, संजय बंगाले, किसन गावंडे, योगेश बन आणि राजू कनाटे यांनी सहकार्य केले.

थोडक्यात

## योगासनात एसआरके इंडो पब्लिक स्कूलची चमक, दोन विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड

### जिल्हास्तरीय योगा स्पर्धेत निशांत काटोले व हिना वसु यांची दमदार कामगिरी

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नागपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय योगा स्पर्धेत जलालखेडा येथील एसआरके इंडो पब्लिक स्कूलच्या



विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या यशात भर घातली आहे. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या दोन विद्यार्थ्यांची विभागीय योगा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. मंगळवार, दि. २२ सप्टेंबर रोजी कविवर्य सुरेश भट सभागृह, नागपूर येथे जिल्हास्तरीय योगा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नागपूर जिल्ह्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग घेतला. विविध योगासन प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी कौशल्य, लवचिकता, संतुलन आणि एकाग्रतेचे दर्शन घडविले. एसआरके इंडो पब्लिक स्कूल, जलालखेडा येथील १४ वर्षे वयोगटात निशांत वासुदेव काटोले आणि हिना संजय वसु यांनी उत्कृष्ट सादरीकरण करत विभागीय योगा स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले. त्यांच्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीला आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

योगासनासारख्या खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक एकाग्रता, आत्मविश्वास आणि शिस्तीची भावना विकसित होत असल्याने शाळेकडून विद्यार्थ्यांना नियमितपणे विविध क्रीडा प्रकारांसाठी प्रोत्साहन दिले जात आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेत मिळालेले हे यश विद्यार्थ्यांच्या मेहनतीसह शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे फलित असल्याचे सांगण्यात आले. आपल्या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांनी प्राचार्य शुभांगी अर्डक, योगा शिक्षिका स्वाती गाखरे, शारीरिक शिक्षक पंकज ठाकरे तसेच आई-वडिलांना दिले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष रणजीत देशमुख, आमदार डॉ. आशिष देशमुख, सुधीर देशमुख, अमिशी अरोरा, कुलदीप हिवरकर, गणेश ठवरे, मुकेश चोपडे आणि प्राचार्य शुभांगी अर्डक यांनी अभिनंदन करून विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## मधुराची कुस्तीच्या आखाड्यात सुवर्णभरारी, विभागीय विजेतेपदासह राज्यस्तरावर झेप!



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

गुरुकुल इंडियन ऑलिम्पियाड स्कूल ऑफ स्कॉलरच्या पुनापूर, पारडी, नागपूरच्या इयत्ता ७ वीतील अत्यंत होतकरू आणि प्रतिभावान विद्यार्थिनी कु. मधुरा सुवर्णा धर्मराज शेंद्रे हिने आज दिनांक २७/०९/२०२६ रोज रविवारला क्रीडा संकुल, भंडारा येथे पार पडलेल्या विभागीय शालेय कुस्ती अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२७ मध्ये दणदणीत विजय मिळवत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. आपल्या उत्कृष्ट कुस्ती कौशल्याचे, जिद्दीचे आणि आत्मविश्वासाचे दर्शन घडवत मधुराने विभागीय स्तरावर पहिल्या फेरीमध्ये वर्धा येथील खेळाडूला हरवत अंतिम फेरी मध्ये स्थान प्राप्त केले व अंतिम फेरीत चंद्रपूर येथील खेळाडूला पराजित करून सुवर्णयश मिळवले.तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे संपूर्ण गुरुकुल परिवाराची मान अभिमानाने उंचावली आहे. कु. मधुराची राज्यस्तरीय कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिच्या कठोर परिश्रम, सातत्य, शिस्त आणि जिद्दीचे हे यशस्वी फलित आहे. मधुराच्या या शानदार यशाबद्दल शाळेचे संस्थाचालक दिनेशसु. मिलमिले, संचालिका ज्योत्स्ना दि. मिलमिले, संचालक प्रशांतजी सोमकुवर, घनश्यामजी श्रीवास, बालाजी महल्ले, रुपेशजी गेडाम शाळेचे मुख्याध्यापक सप्रेम शं. धोटे, व्यवस्थापक विलासजी के.चाफेकर, प्रसन्न बोबडे, वंश मिलमिले व सर्व शिक्षकवृंद तसेच सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून, आगामी राज्यस्तरीय स्पधेर्साठी तिला हार्दिक शुभेच्छा दिल्या. मधुराने राज्यस्तरावरही आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून शाळेचे नाव उंचावावे आणि आणखी मोठे यश संपादन करावे, अशी अपेक्षा संपूर्ण गुरुकुल परिवाराने व्यक्त केली.

## श्री चक्रधर स्वामी विद्यालय मनसर येथे प्रभात फेरीचे आयोजन




**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

सेवा संकल्प अभियान १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबवायचे आहे. या अभियानांतर्गत २६ सप्टेंबर २०२६ ला श्री चक्रधर स्वामी विद्यालय मनसर येथे सेवा संकल्प अभियानांतर्गत प्रभात फेरी काढण्यात आली. प्रभात फेरी अंतर्गत विद्यार्थ्यांना तसेच गावकऱ्यांना सेवा संकल्प अभियानाचे महत्त्व पटवून देण्यात आले. सेवा संकल्प अभियान अंतर्गत प्रभात फेरीत विद्यार्थ्यांनी सेवा संकल्प चे घोषवाक्यचे नारे दिले. प्रभात फेरीत शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा गायकवाड, शिक्षक दिनेश आडे, श्रावण श्रीरामे, माधुरी पायघन, गीता शेंद्रे, गौरी धुर्वे, स्वाती मायवाडे, भुवनेश्वर छोरी, पंकज वांढरे, अनिल भालेकर सहित विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

## शरदचंद्र कृष्णराव आबदेव यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर** : रवींद्रनगर, नागपूर येथील रहिवासी, श्री. शरदचंद्र कृष्णराव आबदेव यांचे २७ सप्टेंबर रोजी रात्री खारघर (मुंबई) येथे दुःखद निधन झाले. त्यांचे वय ९१ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, दोन मुले आणि सुना, दोन मुली व जावई व बराच मोठा आप्त परिवार आहे. खारघर येथील घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# 'वडनगर ते वाराणसी' सेवा संकल्प यात्रेचे रामटेकमध्ये स्वागत

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

भारताचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या ७६व्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा संकल्प अभियानांतर्गत 'जन्मभूमी वडनगर ते कर्मभूमी वाराणसी' सेवा संकल्प यात्रा व सेवा संवाद यांचे रामटेक येथे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

ही सेवा संकल्प यात्रा जवळपास २० दिवस चालणार असून, या यात्रेमध्ये शेकडो सेवायात्री सहभागी झाले आहेत. वडनगर ते वाराणसी असा प्रवास करणारी ही यात्रा देशातील अनेक राज्यांमधून मार्गक्रमण करणार आहे.

यात्रेदरम्यान विविध ठिकाणी केंद्र शासनाच्या जनकल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणे, योजनांचा प्रचार-प्रसार करणे तसेच नागरिकांना या योजनांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन करणे, हा प्रमुख उद्देश आहे. त्याचबरोबर स्वच्छतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवत स्वच्छ आणि विकसित भारताचा संकल्पही या यात्रेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या प्रदीर्घ राष्ट्रसेवेचा गौरव तसेच



विकसित भारत २०४७ आणि आत्मनिर्भर भारत या संकल्पनांना जनमानसापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या सेवा संकल्प यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

रामटेक येथे झालेल्या स्वागत कार्यक्रमाला खजुराहो लोकसभा क्षेत्र, मध्य प्रदेशचे खासदार व्ही. डी. शर्मा, साबरकांठा, गुजरातच्या लोकसभा खासदार शोभाबेन बरैया, भारतीय जनता युवा मोचार्चे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक, तसेच माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी यांच्यासह भारतीय जनता पाटीर्चे प्रमुख पदाधिकारी, नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांचे रामटेक शहराच्या वतीने स्वागत करण्यात आले. सेवा, समर्पण, स्वच्छता आणि राष्ट्रनिमार्णाचा संदेश घेऊन वडनगर ते वाराणसीपर्यंतचा हा प्रवास जनतेमध्ये सकारात्मक जनजागृती निर्माण करणारा ठरणार आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राहुल जी किरपान महामंत्री भाजपा, संजय मुलमुले उपाध्यक्ष भाजपा, चेतन खडसे अध्यक्ष भाजपा युवा मोर्चा, रजत गजभिये अध्यक्ष भाजपा, आलोक मानकर उपाध्यक्ष युवा मोर्चा, धर्मेंद्र शुक्ला अध्यक्ष भाजयुमो रामटेक तालुका उमेश पटेल, सतीश डोंगरे अ.आा. जिल्हाअध्यक्ष, मनोज गिरी, सतीश वाढीभस्मे,योगेश म्हात्रे,नंदू कोहळे इत्यादी भारतीय जनता पार्टी रामटेक शहराच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# पं. संजय मुखर्जी यांच्या तबलावादनाने झाला वाडेगांवकर स्मृती संगीत समारोहाचा समारोप

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

फरुखाबाद घराण्याचे ज्येष्ठ तबलावादक आणि संगीत नाटक अकादमी पुरस्कारप्राप्त पं. संजय मुखर्जी यांच्या प्रभावी तबलावादनाने पं. गोपाळराव वाडेगांवकर स्मृती संगीत समारोहाचा समारोप झाला. त्यांच्या दमदार वादनातून तालातील बारकावे, लयकारी आणि विविध रचनांची सुरेख गुंफण अनुभवताना रसिकांना स्वर-तालाची अविस्मरणीय अनुभूती मिळाली.

दि ब्लाइंड रिलीफ असोसिएशन, नागपूर, पं. गोपाळराव वाडेगांवकर शिष्य परिवार, खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती आणि सप्तक यांच्या संयुक्त विद्यमाने २६ व २७ सप्टेंबर रोजी दक्षिण अंबाझरी मार्गावरील दि ब्लाइंड रिलीफ असोसिएशनच्या प्लॅटिनम ज्युबिली हॉलमध्ये या संगीत समारोहाचे आयोजन करण्यात आले होते.



पं. संजय मुखर्जी यांनी आपल्या स्वतंत्र तबलावादनाची सुरुवात तीन तालाने केली. यानंतर पेशकार, कायदा, रेला, चक्करदार यांसह विविध रचना सादर करत त्यांनी आपल्या वादनातील वैविध्य आणि लयकारीचे दर्शन घडवले. त्यांनी सादर केलेल्या आगळ्यावेगळ्या कायद्याला रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. त्यांच्या सादरीकरणाला हिरण्मोय मित्रा यांनी लहरा संगत केली.

यावेळी मनोगत व्यक्त करताना पं. संजय मुखर्जी म्हणाले, नागपुरात प्रथमच आलो आहे. पं. गोपाळराव वाडेगांवकर यांना स्वरांजली अर्पण करण्यासाठी येथे येण्याची संधी मिळाली, हा माझ्यासाठी आनंदाचा क्षण आहे. नागपूर हे तबला प्रेमींचे शहर असल्याचे ऐकले होते आणि येथे आल्यानंतर त्याची प्रचिती आली. श्रोते हेच संगीताचे खरे भगवान आहेत. त्यांच्या प्रेमामुळे आणि प्रोत्साहनामुळेच कलाकार घडतात. तत्पूर्वी, संगीत अलंकार आणि ज्येष्ठ सरोदवादक विवेक नवरे यांनी सरोदवादनातून पं. गोपाळराव वाडेगांवकर यांना स्वरसुमनांजली अर्पण केली. त्यांनी राग पुरिया कल्याणमध्ये आलाप, जोड, झाला आणि बंदिशी सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांना तबल्यावर संदेश पोपटकर यांनी साथसंगत केली.

खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे उपाध्यक्ष डॉ. दीपक खिरवडकर, दिगंबर पिंपळखरे, डॉ. श्रीराम काणे, विवेक नवरे आणि संदेश पोपटकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ. उदय गुप्ते यांनी केले. त्यांनी पं. गोपाळराव वाडेगांवकर यांच्या सांगीतिक वाटचालीवर प्रकाश टाकत त्यांना आदरांजली वाहिली. दोन दिवस चाललेल्या या संगीत समारोहाला नागपूरकर संगीतप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# ज्ञानातून शाश्वत शेतीकडे नवी वाटचाल

### अस्मिता इन्स्टिट्यूटच्या मोफत सेंद्रिय व नैसर्गिक शेती मार्गदर्शन शिबिराला सुरुवात






**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

अस्मिता इन्स्टिट्यूट ऑफ ऑर्गेनिक अँड नॅचरल फार्मिंग यांच्या वतीने आयोजित मोफत सेंद्रिय व नैसर्गिक शेती मार्गदर्शन शिबिराचा शुभारंभ उत्साहात झाला. महाराष्ट्राचे राज्यमंत्री मा. ना. आशिष जयस्वाल, माजी खासदार तथा अक्ळउ सरचिटणीस अविनाश पांडे आणि कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ-मार्गदर्शक डॉ. एम. एन. वेणुगोपाल यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या १५० हून अधिक विद्यार्थ्यांनी पहिल्या सत्रात सहभाग घेतला. सेंद्रिय व नैसर्गिक शेतीच्या आधुनिक व शाश्वत पद्धतींची माहिती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षणाच्या माध्यमातून देण्यात येणार आहे.

यावेळी रामटेक पोलीस निरीक्षक राजेशकुमार थोरात, नागपूर तालुका कृषी अधिकारी सुनील कोरटे, माजी नगरसेवक किशोर जिचकार तसेच शेतकरी नूर अली यांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमांतर्गत मातीचे आरोग्य, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, जैविक निविष्ठांचा वापर, नैसर्गिक कीड व्यवस्थापन, पीक विविधता तसेच शाश्वत शेतीपद्धती याबाबत प्रत्यक्ष शेतावर आधारित प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे. दरम्यान, या कार्यक्रमाच्या निमित्ताने अस्मिता ऑर्गेनिक फार्म्सच्या स्पाइस गार्डनला 'डॉ. एम. एन. वेणुगोपाल स्पाइस गार्डन' असे नाव देण्याची घोषणा करण्यात आली. या उपक्रमामुळे युवकांमध्ये सेंद्रिय व नैसर्गिक शेतीबाबत जागरूकता निर्माण होऊन शाश्वत शेतीच्या दिशेने नवी वाटचाल सुरू होण्यास मदत होणार आहे.

# खून करण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपातील आरोपीस उच्च न्यायालयाकडून जामीन

### विशिष्ट प्रत्यक्ष कृतीचा आरोप नसल्याचा बचाव पक्षाचा युक्तिवाद, रुद्रविरुद्ध पूर्वीचा गुन्हेगारी रेकॉर्डही नाही

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दिनांक २७ जुलै २०२६ रोजी, तक्रारदार दिनेश सोलंकी यांच्यावर चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याच्या प्रकरणात आरोपी रुद्र याला मा. उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला. या प्रकरणात रुद्रसह अन्य पाच आरोपींवर हल्ल्याचा आरोप असून, तक्रारदाराने चाकूचे वार चुकविल्याने त्यांना कोणतीही दुखापत झाली नसल्याचे न्यायालयासमोर मांडण्यात आले. या घटनेप्रकरणी हुडकेश्वर पोलीस ठाण्यात २८ जुलै २०२६ रोजी, FIR क्रमांक ६४१/२०२६ नोंदविण्यात आला असून, आरोपींविरुद्ध इठर कलम १०९ (२), १९०,१९१ (२) व ३५१(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

आरोपी रुद्रच्या वतीने अधिवक्ता भावेश सुगंध व अधिवक्ता यश ज्ञानचंदानी यांनी उच्च न्यायालयात बाजू मांडताना रुद्रविरुद्ध कोणतीही विशिष्ट प्रत्यक्ष कृती केल्याचा आरोप नसल्याचे निदर्शनास आणून दिले. तसेच तक्रारदारावर चाकू फेकण्याच्या कथित घटनेत रुद्रचा सहभाग नसून, तो मुख्य आरोपी अमन नरहरे याच्या वाहनावर पाठीमागे बसलेला होता, असा युक्तिवाद करण्यात आला. रुद्रविरुद्ध कोणताही पूर्वीचा गुन्हेगारी रेकॉर्ड नसल्याचेही बचाव पक्षाने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तक्रारदारास कोणतीही दुखापत झालेली नसणे आणि आरोपीची कथित भूमिका लक्षात घेता जामीन मंजूर करण्याची विनंती करण्यात आली.

दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकल्यानंतर माननीय उच्च न्यायालयाने आरोपी रुद्र यास जामीन मंजूर केला. आरोपीच्या वतीने अधिवक्ता भावेश सुगंध व अधिवक्ता यश ज्ञानचंदानी यांनी बाजू मांडली, तर राज्याच्यावतीने सरकारी अभियोक्त्यांनी युक्तिवाद केला.

# दक्षिण नागपूरमध्ये शिवसेनेचा ऐतिहासिक पक्षप्रवेश सोहळा, विविध पक्षांतील ३०० कार्यकर्त्यांचा प्रवेश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शहर उपप्रमुख धम्माभाऊ सोनटक्के व दक्षिण नागपूर विधानसभा संघटक विशाल कोरके यांच्या वतीने दक्षिण नागपूर विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचा भव्य पक्षप्रवेश सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. शिवसेना पूर्व विदर्भ संघटक किरण पांडव, शिवसेना आमदार कृपाल तुमाने, जिल्हाप्रमुख व नगरसेवक सुरज गोजे यांच्या हस्ते गळ्यात गमछा टाकून सर्व नवप्रवेशितांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी मान्यवरांनी मार्गदर्शन करताना नवप्रवेशितांचे स्वागत करून सामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी काम करणे, स्थानिक पातळीवर संघटना




मजबूत करणे आणि समाजातील विविध घटकांशी संपर्क वाढविण्याचे आवाहन केले.

पक्षप्रवेश केलेले प्रमुख पदाधिकारी व त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये गौरव तिजारे (राष्ट्रवादी काँग्रेस) गट : राहुल शाहू, राहुल सुटले, रोहित परतेकी, अनिकेत मस्के, शैलेश दिलीपराव साठोणकर, मोहन दीपक लाडसे, शानू राऊत, हर्ष गोजे, संकेत ठाकरे, बादल आगम, संकेत कांबळे, लोकेश कुंभारे, सचिन धार्मिक, यश ढोबळे, गौरव नायगावकर आझाद ठाकूर (काँग्रेस) गट : विभोर भगत, अनंत वाघमारे, राहुल भगत, प्रतिभा भगत, स्वाती पाटील, सरला मून, यमुबाई गेडाम, रेखा डोये, ललिता मडके, कांबळे बाई, योगेश गोले, प्रतीक नगराळे, हेमंत मेश्राम, सुरज तावडे, आयुष्यमान सोनारे, नितीन मेश्राम, हिमांशू मेश्राम, मीनाक्षी लांडगे, अश्वजीत बागडे, सौरव यादव, यश मानकर, यशपाल, ऋषी रगडे, अतुल डहाके गट : कमलेश भाडेकर, अमन मोरकर, निलेश शास्त्रकार, रोशन पंचबाई, अनिकेत वाघाटकर, रोशन पंचभाई, प्रमोद बोंदरे, पप्पू मंडल, पवन इटलकर, संकेत शेंडे, शिवम कांबळी, आयुष लाडीकर, अमर लाडीकर, हर्षल कांबळी, धीरज कांबळे, शुभम मून, तुषार बनसोड, आदर्श बोरकर, रोशन धुराडे, यश नखाते, राहुल डहाके, राहुल बावनकुळे, तुषार चौधरी, कृष्णा मिरासे, अरविंद चव्हाण, प्रकाश भैसवार, राहुल बावणे, अमित बोरकर, आशिष महाजन, विशाल मानकर (आम आदमी पार्टी) गट : निशा बाजगे, संध्या खापरे, सुवर्णा खेरडे, प्रियंका बनसोड, राजेश वाजगे, प्रवीण खापरे, विनोद काकडे, रत्नाकर कांबळे (भाजप) गट : नितेश कांबळे, सविता कांबळे, स्वप्निल काटोले, साजिद शेख, जयश्री ठाकरे, संध्या खापरे, राम जोशी, दिनेश हेडाऊ, नलिनी काटोले, शुभम करमरकर गट : रवींद्र लांजेवार, अरुण पडोळे, अनंता मुळे, बबनराव कालभूत, संजयजी पाचडकर, जगदीश देवकर, तुषार ठाकरे, मयूर मानकर, अशोक मंडपे, मनीश अतकरे, सनी मस्के, प्रशांत धावंडे यांनीही पक्षप्रवेश केला.

कार्यक्रमाला नगरसेवक गणेशभाऊ चर्लेवार, शहरप्रमुख समीर शिंदे, बंडू तळवेकर, माजी नगरसेविका अलका ताई दलाल, माजी नगरसेवक अजय भाऊ दलाल, महिला शहर संघटिका निलिमा ताई शास्त्री, उज्वला उमरे, नलिनी सदावरती, अनिता डोमळे, रूपाली लाखे, शंभरकर ताई, देशपांडे काका, रामदासजी उमरे, स्थानिक लोकाधिकार सेनेचे अध्यक्ष राजा रामद्वार यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्याला निरंजन नाकाडे, पवन वाघमारे, पंकज ढोबळे, किरण शेळके, विनोद चकोर, राहुल पांडे, रुपेश ठाकरे, राकेश भोंदले, उज्वला उमरे, नलिनी सदावरती, रूपाली लाखे, अनिता डोमडे सोनाली उमरे यांचे सहकार्य लाभले.